cmyk

## संपादकीय

### जे पेरू तेच उगवेल...

नुकताच काही जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याची उर्वरित रक्कम जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर, हवामान खात्याने यंदा महाराष्ट्रात मान्सून लवकर दाखल होणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. यामुळे शेतकऱ्यांना पेरणीच्या तयारीत मोठा दिलासा मिळणार आहे. एकीकडे पेरणीची लगबग सुरू असतानाच, दुसरीकडे उच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सहा महिन्यांत घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते निवडणुकीच्या कामाला जोमाने लागतील.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४ | रविवार, दि.१८ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### युट्यूबर ज्योती मल्होत्रा पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक

हिसार : हरियाणाच्या हिसार येथील प्रसिद्ध ट्रॅव्हल यूट्यूबर ज्योति मल्होत्रा हिला पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. 'ट्रॅव्हल विथ जो' या यूट्यूब चॅनेलद्वारे लोकप्रिय असलेल्या ज्योतिला ३.७७ लाखांहून अधिक सबस्क्रायबर्स आहेत. ती आता उत्तर भारतात कार्यरत असलेल्या कथित पाकिस्तानी हेरगिरी नेटवर्कच्या तपासाच्या केंद्रस्थानी आली आहे. हिसार पोलिसांनी ज्योतिला पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांना भारताची संवेदनशील माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली अटक केली. तिच्यावर ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्ट, १९२३ च्या कलम ३, ४ आणि ५ तसेच भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# आठवडाभर राज्यात विजांच्या कडकडाटासह मुसळधार

बीड । प्रतिनिधी

**राज्यात आता आठवडाभर विजांच्या कडकडासह जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. १७ मे पासून २५ मे पर्यंत पूर्वमोसमी पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. हा पाऊस दोन दोन दिवसांच्या अंतराने कोसळणार आहे. त्यामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांनी मशागतीला लागण्याचा सल्लाही त्यांनी दिला आहे. काही दिवसांपासून राज्यातील हवामानात टोकाचे बदल दिसत असताना मान्सूनपूर्व पावसाचे आता आगमन झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**


## शेतकऱ्यांना मशागतीला लागण्याचा सल्ला

हवामान अभ्यासक पंजाब डख यांनी दिलेल्या अंदाजानुसार, १७ मेपासून २५ मेपर्यंत महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पाऊस हा दोन दोन दिवसांच्या अंतराने वेगवेगळ्या भागांमध्ये कोसळणार असून, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा जोर अधिक असेल. शेतकऱ्यांनी ३० मेपर्यंत आपली शेतजमीन मशागत करून तयार ठेवावी, असा सल्लाही पंजाब डख यांनी दिला आहे. या पावसामुळे शेतात सुमारे एक फूट ओलावा निर्माण होण्याची शक्यता आहे. हा पाऊस मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा, कोकण किनारपट्टी, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा ◀◀ पान २ वर





## मान्सूनने अंदमान निकोबार बेट समूह व्यापला



नवी दिल्ली । वृतसंस्था

**मॉन्सूनने प्रगती करत संपूर्ण अंदमान –निकोबार बेट समूह व्यापला. तसेच बंगालचा उपसागर तसेच मालदीव आणि कोमोरीनच्या आणखी काही भागात प्रगत करत मान्सूनने श्रीलंकेच्या दक्षिण भागापर्यंत मजल मारली. इकडे राज्यात पूर्व मोसमी पावसाला पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील ५ दिवस राज्यात काही ठिकाणी वादळी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला.**

मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक वातावरण आहे. त्यामुळे मान्सूनची वाटचाल सर्वसाधारण वेळेच्या आधीच सुरु झाली. मॉन्सूनने गुरुवारी दक्षिण अरबी समुद्रासह, मालदीव- भारत आणि श्रीलंकेच्या दरम्यानचा कोमोरिन भाग व श्रीलंकेच्या दक्षिण किनारपट्टीपर्यंत मजल मारली होती. त्यानंतर एक दिवस त्याच जागी मुक्काम केला होता. मान्सूनने पुढे चाल केली. मान्सूनने शनिवारी दक्षिण अरबी समुद्रात, मालदीव आणि कोमोरीन भागात, बंगालच्या उपसागरात आणखी काही भागात प्रगती केली. तसेच अंदमान आणि निकोबार बेट समूह संपूर्ण व्यापला. मान्सूनच्या वाटचालीस पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसांत मान्सून अरबी समुद्र, मालदीव, ◀◀ पान २ वर

# याचा संतोष देशमुख पार्ट–२ करायचा!

## शिवराज दिवटेला लोखंडी रॉड, कत्तीने मारहाण, डोक्यात बाटलीही फोडली

बीड । प्रतिनिधी

**बीडच्या परळी येथे शुक्रवारी संध्याकाळी एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली होती. शिवराज दिवटे असे या तरुणाचे नाव आहे. एका टोळक्याने त्याचे अपहरण करुन त्याला डोंगराच्या भागात नेले आणि बांबू आणि लाकडाने बेदम मारहाण केली होती. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ माजली होती. मारहाण झाल्यानंतर शिवराज दिवटे गंभीर जखमी झाला होता. त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या सगळ्या प्रकारानंतर शनिवारी शिवराज दिवटे याने माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्याने आपल्याला लोखंडी रॉड आणि कत्तीने मारहाण झाल्याचे सांगितले. तसेच टोळक्यातील काहीजण, याचा संतोष देशमुख पार्ट–२ करायचा, असे म्हणत असल्याचेही शिवराजने सांगितले.**





शिवराज म्हणाला, मी जलालपूर येथे सप्ताहाच्या जेवणासाठी गेलो होतो, जेवणानंतर तिथे काही जणांमध्ये भांडण लागले होते तिथे मी भांडण पाहायला उभा होतो. त्यानंतर शिवाजीनगरला मी मित्राला सोडून रिलायन्स पेट्रोल पंपाकडे जात होतो. पेट्रोल पंपाजवळ पाच गाड्यावरील पोरांनी रस्ता रोखत मला मारहाण केली आणि मला रत्नेश्वर डोंगरावर घेऊन गेले. मला मारहाण करताना ते बोलत होते की, याला सोडायचे नाही, याचा संतोष देशमुख पार्ट–२ करायचा. ते मला मारून टाकणार होते. त्यामुळे त्यांना फाशीची शिक्षा दिली पाहिजे. तेथील दोन माणसांनी जर मला मारताना बघितले नसते तर मी जिवंत राहत ◀◀ पान २ वर

### “ मारहाण प्रकरणाला जातीय रंग देऊ नका – पोलीस अधीक्षक

परळी तालुक्यातील टोकवाडी परिसरात झालेली मारहाण ही तत्कालिक कारणातून झाली आहे. या प्रकरणाला कुठलाही जातीय रंग देण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, असे आवाहन बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केले आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. दोन आरोपी अल्पवयीन असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिली.

### “ परळी दहशतवादाचा अड्डा, ऑपरेशन सिंदूरसारखं ऑपरेशन राबवा – अंजली दमानिया

परळी दहशतीचा अड्डा झाला आहे. खरेच याला गंभीरतने घेतले पाहिजे. शुक्रवारी जी मारहाण झाली त्यामध्ये सगळी मुले १८ वर्षांची होती. या सगळ्या मुलांची मारहाण बघून, ज्याला मारले त्याला पाया पडायला लावले, त्यावरुन असे वाटतेंय की, ही रिव्हेंज केस आहे. हे सगळे भलत्याचा दिशेने चालले आहे. ऑपरेशन सिंदूरप्रमाणे बीडमध्ये एखादे ऑपरेशन राबवले पाहिजे, असे अंजली दमानिया यांनी म्हटले.

### “ वीस जणांवर गुन्हा दाखल

याप्रकरणी परळी मधील संभाजीनगर पोलीस ठाण्यात समाधान मुंडे, रोहित मुंडे, आदित्य गीते, ऋषिकेश गिरी, प्रशांत कांबळे, सन्मित्र शिंदे, सौमित्र गोरे, रोहन वगळकर, सुरज मुंडे, स्वराज्य गीते असे दहा आरोपी आणि अनोळखी दहा अशा एकूण वीस जणांवर बीएनएस कलम १०९, १२६(२), १४०(३), ११८(१),१८९(२),१८९(४),१९०, १९१(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उनिरीक्षक शिंदे यांच्याकडे देण्यात आला आहे.

## युवकास जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण

### दिंद्रुड पोलिसात ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल

दिंद्रुड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील लोनगाव पुनर्वसन वस्ती येथील युवकास जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करण्यात आल्यामुळे आरोपीविरोधात दिंद्रुड पोलीसात ॲट्रॉसिटी दाखल करण्यात आली आहे.**



लोनगाव पुनर्वसन वस्ती येथील अमोल मुंजा आलाट हा शुक्रवारी सायंकाळी ४ वाजे दरम्यान घरी हेडफोन गळ्यात घालून बसलेला असतांना विशाल सर्जेराव मेंढके हा तेथे येवून तु हेडफोन का वापरतो म्हणत जातीवाचक शिवीगाळ करत कोयत्याने वार केला.सायंकाळी अमोल आलाट हा मारोती मंदिरासमोर गेला असता विशाल सर्जेराव मेंढके सह तिन अनोळखी आरोपींनी ◀◀ पान २ वर

## अमेरिकेच्या दबावापुढे मोदींचे सरकार आयएमएफमध्ये झुकले

### जयराम रमेश यांचा आरोप

नवी दिल्ली । वृतसंस्था

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आयएमएफला पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या मदतीचा पुनर्विचार करण्याची विनंती केल्यानंतर एका दिवसानंतर, काँग्रेसने आरोप केला की मोदी सरकारने आयएमएफ कार्यकारी मंडळाच्या बैठकीत त्या देशाला कर्ज देण्याबाबत चर्चा केली तेव्हा अमेरिकेच्या दबावापुढे झुकले.

काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी इन प्रभारी कम्युनिकेशन्स जयराम रमेश म्हणाले की, राजनाथ सिंग यांनी ९ मे २०२५ रोजी पाकिस्तानला कर्ज मंजूर केल्याबद्दल आयएमएफवर टीका करत आहेत, पण २९ एप्रिल रोजीच मोदी सरकार जागे होण्यापूर्वीच काँग्रेसने म्हटले होते की, आयएमएफ कार्यकारी मंडळ ◀◀ पान २ वर

## धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचे सदस्य नोंदणी अभियान जोमात

### रविवारी घाटनांदूर येथे होणाऱ्या सदस्य नोंदणीस उपस्थित रहा–देशमुख, शिरसाट, औताडे

परळी । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान जोमात सुरू असून उद्या रविवारी सकाळी नऊ वाजल्यापासून घाटनांदुर येथे सदस्य नोंदणी अभियान संपन्न होणार आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीचे जिल्हा परिषद गटनिहाय नियोजन करण्यात आले असून, घाटनांदुर येथील सदस्य नोंदणी अभियानाचे उद्घाटन माजी आमदार संजय भाऊ दौंड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या बियाण्यात सर्व पदाधिकारी कार्यकर्ते ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ मे २०२५

आवक क्किंटलमध्ये तर भाव प्रतिक्किंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३९.५० क्किंटल | २,५०३ | ३,०२५ | २,७२९ |
| ज्वारी/हायब्रिड: ३८.५० क्किंटल | १,७०० | २,९६१ | २,३०६ |
| मका/लोकल:१.०० क्किंटल | २,१९० | २,१९० | २,१९० |
| तूर : ३८.०० क्किंटल | ६,५०० | ६,७०० | ६,६०७ |
| उडीद : १.०० क्किंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६३.५० क्किंटल | २,०८२ | २,४७५ | २,३८० |
| मुग :४.५० क्किंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ४०.०० क्किंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: २.५० क्किंटल | ५,४०० | ५,४१० | ५,४०५ |

## ऑपरेशन सिंदूर राबवण्यापुर्वी पाकिस्तानला त्याची माहिती दिली होती!

### परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांच्या कथित व्हायरल वक्तव्यावर राहुल गांधींची टीका

नवी दिल्ली । वृतसंस्था

ऑपरेशन सिंदूर राबवण्यापुर्वी पाकिस्तानला त्याची माहिती दिली होती, अशा आशयाचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचे एक कथित वक्तव्य व्हायरल झाले. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी परराष्ट्र मंत्र्यांच्या या वक्तव्याचा दाखला देत परराष्ट्र मंत्र्यांसह सरकारवर जोरदार हल्ला चढवला. मात्र एस. जयशंकर यांचे हे वक्तव्य फेक आहे, अशा प्रकारचे कुठलेही वक्तव्य त्यांनी केले नाही, असा दावा पीआयबीने केला. दरम्यान, या वक्तव्यावरून विरोधी पक्षांनी सरकारची ◀◀ पान २ वर

## भारत देणार पाकिस्तानला आणखी एक झटका

### आता चिनाब नदीचे पाणी वळवणार

नवी दिल्ली । वृतसंस्था

**पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल वाटप करार निलंबित केला. त्यानंतर भारत–पाकिस्तान संघर्ष झाला, युद्धविरामही झाला. पण अद्यापही हा करार स्थगितच ठेवण्यावर भारत ठाम आहे. या पुढे जाऊन भारताने आता आणखी आक्रमक जलनीतीचे धोरण स्वीकारले आहे. आता चिनाब नदीवरील रानबीर कालव्याची लांबी वाढवण्याची केंद्र सरकारची योजना आहे.**

सद्य:स्थितीत भारत चिनाब नदीचे पाणी मुख्यतः सिंचनासाठी मर्यादित प्रमाणात वापरत आहे. मात्र, आता सिंधू जलवाटप करार निलंबित केल्यामुळे ऊर्जा निर्मिती क्षेत्रातही या पाण्याचा वापर वाढवण्याची शक्यता आहे, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. रानबीर कालव्याची लांबी १२० किमीपर्यंत वाढवण्याची मोठी योजना आहे, या संरचनेच्या उभारणीस वेळ लागणार असल्याने सर्व संबंधित यंत्रणांना प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असेही सांगण्यात आले. याशिवाय कठुआ, रावी आणि परगवाल कालव्यांमध्ये गाळ काढण्याचे कामही सुरू झाले आहे, असे दुसऱ्या ◀◀ पान २ वर

# टेक क्रांतीमध्ये भारताचा जगात टॉप ६ देशांमध्ये समावेश

## भारताकडून ६ जी पेटंट दाखल

मुंबई । प्रतिनिधी

**देशाच्या तंत्रज्ञान प्रगतीशी संबंधित महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भारताने तंत्रज्ञान क्रांतीकडे आणखी एक पाऊल टाकण्यास सुरूवात केली आहे. भारताने ६ जी पेटंट दाखल करत जगातील टॉप ६ देशांमध्ये सामील होण्याचा मान पटकावला आहे.**

भारत आता वेगाने ६ जी कडे वाटचाल करत असल्याचे दूरसंचार राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासानी यांनी सांगितले. भारत ६ जी २०२५ परिषदेदरम्यान १११ हून अधिक संशोधन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. ◀◀ पान २ वर




### सध्या भारतात ५ जी सेवा

२०३५ पर्यंत ६ जी भारताच्या अर्थव्यवस्थेत १ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सची भर घालू शकते. ६ जी सेवा सर्वसामान्यांसाठी कधी सुरू करता येईल? सध्या तरी याबाबत कोणतीही अचूक माहिती समोर आलेली नाही. सध्या भारतात, एकीकडे रिलायन्स जिओ, एअरटेल हे ५ जी सेगमेंटमध्ये वर्चस्व गाजवत आहेत, तर दुसरीकडे व्होडाफोन, आयडिया देखील ५ जी नेटवर्कचा वेगाने विस्तार करण्यात गुंतलेली आहे.

### जगातील हे देश ६ जी तंत्रज्ञान विकासात पुढे

अहवालांनुसार, सध्या अमेरिका, चीन, जपान, दक्षिण कोरिया आणि युरोपियन युनियन ६ जी तंत्रज्ञान विकसित करण्यात आघाडीवर आहेत. भारतही या शर्यतीत वेगाने धावत आहे. भारत सरकार ६ जी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संस्था आणि खाजगी कंपन्यांच्या सहकार्याने काम करत आहे. ती संशोधन आणि विकास करत असल्याचे देखील स्पष्ट करण्यात आले आहे आहे.

cmyk

## अग्रलेख

# जे पेरू तेच उगवेल...

नुकताच काही जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याची उर्वरित रक्कम जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर, हवामान खात्याने यंदा महाराष्ट्रात मान्सून लवकर दाखल होणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. यामुळे शेतकऱ्यांना पेरणीच्या तयारीत मोठा दिलासा मिळणार आहे. एकीकडे पेरणीची लगबग सुरू असतानाच, दुसरीकडे उच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सहा महिन्यांत घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते निवडणुकीच्या कामाला जोमाने लागतील. शेतकऱ्यांना पुन्हा एकदा आश्वासने मिळतील आणि इच्छुक उमेदवारांच्या प्रचाराचा व शेतकऱ्यांच्या पेरणीच्या कामाचा वेग वाढेल. 'जे पेरतो तेच उगवतं' हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्रातील शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. त्यातच शेतमालाला रास्त भाव मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांवर कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकट कोसळत असते. शेती विषयीची सरकारची धोरणे आणि महागाईच्या चटक्याने तर शेतकरी पुरताच नागवला गेलाय. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी हलाखीच्या आर्थिक परिस्थितीला वैतागून आत्महत्या केल्यात. एक न अनेक संकटांचा फास बसलेल्या शेतकऱ्यांना पीक विमा हे एक सुरक्षा कवच ठरते. आता, विमा कंपन्यांनी उर्वरित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळालाय. त्यातच मान्सून लवकर दाखल होणार असल्याच्या हवामान खात्याच्या अंदाजामुळे शेतकऱ्यांना यंदा तरी चांगले पिक येण्याची आशा निर्माण झालीय.

परंतु, याच काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या परिस्थितीत राजकीय पक्ष आणि त्यांचे कार्यकर्ते निवडणुकीच्या प्रचारात व्यस्त असतील आणि शेतकरी पेरणीच्या तयारीला लागतील आणि याच परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांना पुन्हा आश्वासनांची खैरात वाटली जाईल. त्यांच्या मुळ समस्यांकडे मात्र दुर्लक्षच केले जाईल. हीच बाब लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी राजकीय नेते आणि कार्यकर्ते निवडणुकीत व्यस्त असताना शेतकरी हिताच्या निर्णयावर ठाम राहणे गरचेचे आहे. कारण 'जे पेरतो तेच उगवतं'. हीच स्थिती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत होणार आहे. हे लक्षात घ्यायला हवे. आता वेळ आलीय ती शेतकऱ्यांनी शेतकरी म्हणून एकत्र येण्याची, जाती पातीचे, धर्म द्वेषाचे, आर्थिक अमिष बाजूला ठेऊन स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेण्याची. देशाचे, राज्याचे शेतकरी धोरण जरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आखले जात नसले त्यावर इथे जरी निर्णय घेतले जात नसले तरीसुद्धा याच स्थानिक स्वराज्य संस्थांमधून अशा निर्णयाची थेट अंमल बजावणी होत असते, आणि टेबलाखालून कारभार करणाऱ्या प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांचा पांढरा हत्ती इथेच पोसला जातो. खालपासून वरपर्यंत पोचणारी भ्रष्टाचाराची चैन तोडून सरकारकरवी मंजूर झालेल्या योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचवता येतील, फाईल पुढे सरकवता येतील, नडले - अडले प्रशासकीय प्रश्न सोडवता येतील. त्यासाठी महत्वाच्या ठरतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका. या निवडणुका केवळ राजकीय पक्ष आणि इच्छुक उमेदवारांपुरत्या मर्यादित नाहीत तर देशाचा कणा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या अस्तित्वासाठी महत्वाच्या ठरणार आहेत. शेतकऱ्यांच्या जीवावर उठणारा पांढरा हत्ती पोसणाऱ्या व्यवस्थेच्या मुळावर घाव घालण्यासाठी निर्णायक ठरणार आहेत.

# एकवीस वर्षापुर्वीचे मित्र स्नेह संमेलनात आले एकत्र

## काय ती शाळा,काय ते वर्ग, अजुनही आठवतंय की सर्व; दिलखुलास गप्पांनी जुन्या आठवणींना मिळाला नवा उजाळा



**बीड । प्रतिनिधी**

**शिरूरकासार तालुक्यातील खालापूरी येथील आदर्श विद्यालयातील सण २००३-०४ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन हॉटेल गोल्डन चॉईस येथे स्नेह संमेलन पार पाडले. मैत्री आणि ती पण बाल पणाची निस्वार्थ मैत्री आणि त्यात तब्बल एकवीस वर्षांनी भेट हा योग जवळजवळ सर्वांनी अनुभवला आजकाल सर्वजण करत असलेली गेट टुगेदर ची परंपरा याही विद्यार्थ्यांनी पार पाडली .**

यावेळी जवळजवळ पस्तीस विद्यार्थी विध्यार्थिनी उपस्थित होत्या यावेळी सर्वांनी मनोगत व्यक्त केले सर्वांनी एकत्र गप्पा मारल्या आणि सोबत स्नेहभोजन करून कार्यक्रम पार पडला. खूप दिवसानंतर विखरलेली ही पाखर एकवीस वर्षांनी एकत्र आल्यावर सगळ्यांना भावनावश अनुभव प्राप्त झाला. एक अवस्मरणीय भेट आणि त्या भेटीचा क्षण प्रत्येकाने मोबाईल मध्ये कैद केला एकमेकांना शेअर केला आणि अगदी आंनदमय वातावरनात विदयार्थी स्नेहसंमेलन पार पडलं.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बापू परजने, भारत ठोसर,आदम शेख,किशोर उगले, चंदू खरपाडे,श्रीकांत तुरुकमारे यांनी विशेष मेहनत घेतली.यावेळी गेट टुगेदर या कार्यक्रमाला बापू परजणे,किशोर उगले, मिलन उगले, आजिनाथ उगले, अमोल भस्मारे, महादेव उगले, सतीश खरपडे, अरुण गात, सखाराम बनगे, नारायण आनंदकर, पोपट बनगे, धनंजय बनगे, रईस शेख, असलम पठाण, माऊली थिटे, श्रीकांत तुरुकमारे, विलास पवार, कैलास पवार, हनुमान गवळी, दत्ता परजणे, हरीभाऊ जाधव, विनोद जाधव, चंदू खरपाडे, निलेश परजणे, हनुमान परजणे, संतोष विटोरे, बाबासाहेब कापसे, गणेश यादव, भरत ठोसर, महेश देशमुख, आदम शेख, शरद नवले,राधा पवार, छाया लिहिणे, पल्लवी पानगे, मंजुश्री परजणे, सरिता काळे, मंदा डोके, मनीषा भस्मारे, मीरा परजणे, शीला लिहिणे इत्यादी सर्वजण उपस्थित होते.यावेळी एकमताने स्वर्गवाशी विठाबाई फावडे या वर्गमैत्रिणीला सर्वांनी मिस केल आणि तिच्या मुलीला उरलेली रक्कम देण्याचे ठरवलं. मैत्री काय करू शकते याच मोठा आदर्श यावेळी ह्या बॅच ने दिला दारू, मटण आणि डीजे वर नाचून पैसे खर्च करण्यापेक्षा आणि आपली भडास काढण्यापेक्षा व दोस्तीत कुस्ती करण्यापेक्षा उरलेली रक्कम वारलेल्या स्वर्गवाशी वर्गमैत्रिणीच्या अनाथ मुलीला दिली गेली हा आदर्श ह्या बॅच ने घालून दिला.स्नेहसंमेलन सकाळी दहा वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत होत, कार्यक्रमांच सूत्रसंचालन जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन बाप्पू परजने यांनी केले.यावेळी सर्वांनी पुन्हा भेटण्याची आणि असच स्नेह संमेलन करण्याची इच्छा व्यक्त केली.

# ५५० ब्रास वाळू उत्खनन करून वाहतूक केल्याने १७ वाळू तस्करांवर गुन्हे दाखल

## विजय चव्हाण यांची धडाकेबाज कारवाई

**अंबड । प्रतिनिधी**

**गोदावरीचा वाळवंट करणारे वाळू माफिया यांच्यावर धडाकेबाज कारवाई करून १७ वाळू माफयावर गुन्हा दाखल करण्यात आला. अंबड तालुक्यातील कुरण येथील लक्ष्मी आईचा पॉईंट असलेल्या गोदावरी नदीपात्रात तसेच कुरण वस्तीवर अवैधरीत्या ५५० ब्रास वाळुचे उत्खनन व वाहतुक केल्यावरुन कुरण येथील १७ वाळु तस्करांवर उपविभागी अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण यांच्या आदेशानुसार गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

महसुल मंडळाधिकारी एडके व श्री. कारमपुरी तसेच तलाठी स्वप्नील खरात, तलाठी धारे, महसूल सेवक मनोज उघडे व श्याम विभुते यांच्यासह गोंदी ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक इब्राहिम शेख यांचा सहभाग असलेले संयुक्त पथक यांनी गोदावरी नदीपात्रात पाहणी करीत असतांना कुरण येथील लक्ष्मी आईचा पॉईंट असलेल्या गोदावरी नदीपात्रात ठिकठिकाणी अवैधरीत्या रेतीचे उत्खनन करून अंदाजे २०० ते २५० ब्रास वाळुचे उत्खनन व वाहतुक केली असल्याचे त्यांना दिसुन आले. त्यापैकी ३६ ब्रास वाळूचा साठा जप्त करुन तहसील कार्यालयात जमा करण्यात आला. सदर ठिकाणी अवैधरित्या उत्खनन व वाहतुक करणाऱ्या व्यक्तीबाबत संबंधित स्थानिक गावकरी यांना पथकाने विचारणा केली असता त्यांनी राहुल रामदास राक्षे, प्रल्हाद बाबासाहेब राक्षे, सुरेश शेषनारायण राक्षे, ऋषीकेश अप्पासाहेब राक्षे, निलेश बबन कुरणकार, महादेव दादासाहेब कुन्हे, भाऊसाहेब अशोक भोसले, लहानु कांता वाहूळ, नारायण लाला सोलनकर व राजेंद्र बबन कुरणकर (सर्व रा. कुरण, ता. अंबड) यांनी संगनमत करून गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या अंदाजे २०० ते २५० ब्रास वाळुचे ट्रॅक्टर, ट्रॅक्टर लोडर, हायवा, जेसीबी व ट्रक वाहनांद्वारे अवैधरीत्या वाळुचे उत्खनन करुन चोरी केल्याचे सांगितले. तसेच राजेंद्र कुरणकर यांनी वरील व्यक्तींना वाळू वाहतुकीसाठी रस्ता उपलब्ध करुन दिल्याचेही सांगितले. त्यानंतर (ता. १४) दुपारी ४ वाजेच्या सुमारास कुरण येथील वस्तीवर पात्रालगत अवैधरीत्या वाळुचे उत्खनन व वाहतूक केली आले. सदर ठिकाणी अमोल रमेश चुनाडे, बापु शाहू थोरात, संतोष अर्जुन मदने, भरत हरिभार शेंडगे, ब्रम्हा काशिनाथ मगरे, अमोल अनंता थोरात, संतोष रावसाहेब शेंडगे (सर्व रा. कुरण वस्ती, ता. अंबड) यांनी



संगनमत करून गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या अंदाजे ३०० ब्रास वाळुचे ट्रॅक्टर, ट्रॅक्टर लोडर, हायवा, जेसीबी व ट्रक वाहनांव्दारे अवैधरीत्या वाळुचे उत्खनन करून चोरी केल्याचे त्यांनी सांगितले. कुरण येथील लक्ष्मी आईचा पॉईंट असलेल्या गोदापात्र तसेच कुरण वस्तीलगत गोदापात्र या ठिकाणाहून अंदाजे ५५० ब्रास अज्ञात वाहनाव्दारे वाळू चोरून नेली. याप्रकरणी धनगर पिंपरी सजाचे ग्राम महसुल अधिकारी स्वप्नील खरात यांच्या फिर्यादीवरून कुरण येथील वरील १७ वाळु तस्करांविरुध्द गोंदी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता ३०३ (२), ३ (५), गौण खनिज अधिनियम कलम ३, ४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बालाजी पदमाने हे करीत आहेत.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी गणेश गड येथे अद्ययावत अभ्यासिका उभारू-आ.सुरेश धस

**आष्टी । पतिनिधी**

**गणेश गड हा परिसर अत्यंत शांत आणि प्रसन्न असून भगवानगडाच्या धरतीवर गणेश गड येथे अध्यायावत सुविधा युक्त दर्जेदार अभ्यासिका उभारणी करू असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.**

गणेशगड येथे चतुर्थी निमित्त ह.भ.प.राम महाराज यांचे कीर्तन श्रवण करण्यासाठी आले असता.. उपस्थित यांची संवाद साधताना ते बोलत होते या वेळी आपल्या सर्वांचे दैवत गणेश गड संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. काशिनाथ महाराज यांचे कौतुक करताना म्हणाले की, काशिनाथ महाराज कधीही कुणाला काही मागत नाहीत... लोक जे देणगी देतील त्यातून जेवढे होईल तेवढे काम करतात. कुणावर कसलाही भार टाकत नाहीत. मला तुमचा आशीर्वाद आहे मी विधानसभा निवडणुकीच्या अगोदर त्यांच्या आशीर्वाद घेऊन गेलो होतो आणि आता आमदार झाल्यानंतरही त्यांच्या आशीर्वाद घ्यायला आलो आहे. काशिनाथ महाराजांनी गणेश गडावर वृक्ष लागवड केलेली आहे ती खरोखरच नावाजण्याजोगी आहे. वृक्ष लागवड केल्यामुळे गणेश गडाला खूप मोठी शोभा आली आहे आणि निसर्ग संवर्धनाचे काम झालेलं आहे. गणेश गडाचा परिसर हा खूप शांत आणि प्रसन्न आहे या ठिकाणी परिसरातील गावांमधील विद्यार्थ्यांसाठी शहरात जाणे अवघड असून हुशार आणि अभ्यासू विद्यार्थ्यांना अगदी या डोंगरी भागात देखील अभ्यासाची संधी मिळावी असे आपणास मनमन वाटत असून त्यासाठी परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेमध्ये



यश मिळावे यासाठी परिपूर्ण अद्ययावत आणि संपूर्ण सुविधांयुक्त अशी अभ्यासिका उभारणी करू त्यासाठी कोटी दीड कोटी रुपये खर्च झाला तरी आपण भगवानगडाप्रमाणे या ठिकाणी अभ्यासिकेची उभारणी करू असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले.त्यामुळे या परिसरातील अभ्यासू,गोरगरीब विद्यार्थ्यांना खूप मोठा फायदा होईल. आणि येत्या एक ते दीड वर्षांमध्ये येथे अभ्यासिका इमारत बांधकाम पूर्ण करू. यासाठी लागणारे इमारतीचा खर्च, फर्निचर, हे सर्व काम करण्यासाठी मी पाठपुरावा करील.. असेही त्यांनी शेवटी सांगितले तसेच गणेश गडाच्या परिसरात अजून जेवढी झाडे लावायचे आहेत तेवढी १० ते १५ फूट उंचीची २ ते ३ वर्ष वयाची झाडे जून महिन्याच्या अगोदर मी स्वतः देईल ते गडाच्या माध्यमातून परिसर आणखी हिरवागार करण्यासाठी प्रयत्न करू असेही त्यांनी सांगितले. गणेश गडाचा भव्य दिव्य नारळी सप्ताह आष्टी मध्ये करण्यासाठी आ. सुरेश धस यांनी श्रीक्षेत्र गणेश गडाचे महंत काशिनाथ महाराज यांच्याकडे परवानगी मागितली. अगोदरच्या गावाने नारळ घेतले आहे त्यानंतरचा सप्ताह नारळ आष्टी मध्ये देऊ असे बाबांनीही सांगितले. यावेळी ह.भ.प. महंत काशिनाथ महाराज यांनी सुरेश धस ही व्यक्ती कर्तृत्ववान असून सर्वांच्या कामाचा माणूस अशी त्यांची संपूर्ण महाराष्ट्र राज्यात प्रतिमा निर्माण झालेली आहे.. आणि ते प्रत्येक माणसाला एकदा भेट झाली तरी लक्षात ठेवतात असे गौरवोद्गार काढले. यावेळी गणेश गड परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते.

## पान १ वरून...

### आठवडाभर राज्यात विजांच्या

आणि उत्तर महाराष्ट्रात अधिक प्रमाणात पडेल. त्याचबरोबर पूर्व व पश्चिम विदर्भातही पावसाचा जोर असेल. विजांचा कडकडाट आणि वाऱ्याचा जोरही काही भागांत जाणवू शकतो. नागरिकांनी विजेपासून सुरक्षित अंतर ठेवावे, झाडांखाली थांबू नये, असे आवाहनही डख यांनी केले आहे. हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्यामुळं देशभरातील अनेक राज्यांमध्ये पुढील ४ ते ५ दिवस पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात ढगाळ वातावरण कायम राहणार असून, काही भागात पावसाची शक्यता असल्याने अलर्ट जारी करण्यात आले आहेत. पुणे, पालघर, ठाणे, मुंबई, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या भागांमध्ये आकाश ढगाळ राहणार असून, दुपारच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. राज्यात पुढील आठवड्यात देखील पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. त्यात २०, २१ व २२ मे रोजी तळ कोकण, गोवा, दक्षिण मध्य महाराष्ट्रात मुसळधात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दि. ३१ मे पर्यंत म्हणजेच मान्सून केरळात दाखल होईपर्यंत, मुंबईसह कोकण व संपूर्ण महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाची शक्यता आहे.

------------

### याचा संतोष देशमुख

नव्हतो. लोखंडाची रॉड, कत्ती, लाकूड यांनी मला मारहाण केली. माझ्या डोक्यात बाटली देखील मारण्यात आली, पण ती फुटली नाही. सर्व आरोपी गांजा प्यायले होते, असे शिवराज दिवटे याने सांगितले.

------------

### मान्सूनने अंदमान निकोबार

कोमोरीन, बंगालच्या उपसागराचा आणखी काही भागात दाखल होण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

### राज्यात पावसाचा अंदाज

राज्यात पावसासाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा, खानदेश, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात काही ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे. यावेळी ४० ते ६० किलोमिटर प्रतितास वेगाने वारेही वाहतील, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

-------------

### धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचे

तसेच विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभागी होऊन जास्तीत जास्त नागरिकांचे सदस्यत्व पक्षात नोंदवून घ्यावे असे आवाहन परळी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष गोविंदराव देशमुख अंबाजोगाईचे तालुकाध्यक्ष राजेभाऊ अवताडे तसेच जिल्हा सरचिटणीस शिवाजीराव शिरसाठ यांनी केले आहे. या अभियानास युवक नेते अजय मुंडे, ज्येष्ठ नेते दत्ता पाटील, पांडू तात्या हारे, रंजीत चाचा लोमटे, अजितदादा गरड, जयवंतराव देशमुख, ज्ञानेश्वर बप्पा जाधव, बळवंतराव बावणे, सचिन अपेट, डॉक्टर अजितदादा देशमुख, बाळासाहेब देशमुख, मेहबूब शेख, सुंदरराव साळुंखे, बालासाहेब शेप, शरद बावणे, सुधीर चाटे, बाबुराव जगताप सर, वसंतराव देशमुख, विश्वंभर फड, बंडू गीते, बापूसाहेब गीते, माऊली गरजे, हनुमंतराव गायकवाड, नाथराव घुले, महादेव निळे, अर्जुन जाधव, नामदेव घुले, राखीताई अंधारे, आतार जागीरदार, गणेश देशमुख, शोभाताई कदम, भास्कर गोडबोले, महादेव सोनपीर, रामराव शिरसाट, अरुण नागरगोजे, शिवाजी चव्हाण, बळीराम घोंगडे, वामन बापू जाधव, दादा वैद्य, सुरेश मिसाळ सर, श्रीकृष्ण गीते, मच्छिंद्र वालेकर, बालासाहेब राजमाने, उत्तमराव जाधव, श्रीमंत शिंदे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

------------

### अमेरिकेच्या दबावापुढे मोदींचे

९ मे रोजी या मुद्द्यावर विचार करण्यासाठी बैठक घेत आहे आणि भारताने त्याचा जोरदार विरोध करावा अशी मागणी केली होती याची आठवण करून दिली होती असेही यावेळी सांगितले. पुढे बोलताना जयराम रमेश म्हणाले की, असे दिसून आले की भारत फक्त ९ मे रोजी गैरहजर राहिला. नंतर मोदी सरकारच्या ढोलकी वाजवणाऱ्या, जयजयकार करणाऱ्या आणि समर्थकांनी असा युक्तिवाद केला की भारतासमोर हा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. हे खोटे आहे, असा दावा केला. जयराम रमेश पुढे म्हणाले की, आयएमएफ बँकेच्या कार्यकारी मंडळात खरोखरच 'नाही' असे मत देण्याची तरतूद आहे, असेही यावेळी स्पष्ट केले. सप्टेंबर २०१६ मध्ये रशियाने युक्रेनला कर्ज देण्याच्या प्रस्तावावर नकार दिला होता आणि भारतानेही ११ सप्टेंबर २००५ रोजी झिम्बाब्वेच्या हकालपट्टीच्या मुद्द्यावर नकार दिला होता, असे काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी स्पष्ट केले. जयराम रमेश शेवटी बोलताना म्हणाले की, जिथे इच्छाशक्ती असते तिथे मार्ग असतो. ९ मे रोजी आयएमएफ कार्यकारी मंडळाच्या बैठकीत मोदी सरकारने अमेरिकेच्या दबावापुढे झुकले, असल्याचा आरोपही यावेळी जयराम रमेश यांनी केला.

------------

### युवकास जातीवाचक

चापटाबुक्क्यांनी व दगडांनी अमोल आलाट यास मारहाण करत जखमी केले. अमोलला पात्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार्थ शुक्रवारी दाखल करण्यात आले होते.दिंद्रुड पोलीसात अमोल मुंजा आलाट यांच्या फिर्यादीवरून चौघांवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम (अ‍ॅट्रॉसिटी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस उपअधीक्षक अनिल चोरमले तपास करीत आहेत.सर्व आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. बीड जिल्ह्यात शुक्रवारी मारहाणीच्या दोन घटना घडल्या आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून पालकमंत्री अजित पवार यांनी गुन्हेगारी आवळण्यासाठी बीड जिल्ह्यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.त्याचप्रमाणे आरोपीस तात्काळ अटक न केल्यास डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल.

**-नवनाथ कांबळे**
**डीपीआय जिल्हाध्यक्ष बीड**

-------------

### भारत देणार पाकिस्तानला

अधिकाऱ्याने सांगितले. भारताने सिंधू जल करार निलंबित केल्यामुळे पाकिस्तानच्या कृषी क्षेत्रावर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे, जे पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते.

------------

### ऑपरेशन सिंदूर राबवण्यापुर्वी

कोंडी करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्र्यांच्या कथित वक्तव्याच्या व्हिडीओ शेअर करत 'भारताने पाकिस्तानवर हल्ला करण्यापुर्वी त्यांना माहिती देणे हा गुन्हा होता. भारत सरकारने तसे केल्याची कबुली परराष्ट्र मंत्र्यांनी जाहीरपणे दिली. मात्र असे करण्याला कोणी परवानगी दिली? परिणामी आमच्या हवाई दलाचे किती नुकसान झाले?' असे प्रश्न विचारत राहुल गांधींनी परराष्ट्र मंत्र्यांसह भारत सरकारवर हल्ला चढवला. व्हायरल झालेल्या कथित वक्तव्यात परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यापूर्वी आम्ही पाकिस्तानला सांगितले की, आम्ही दहशतवादी तळांवर कारवाई करत आहोत. आम्ही पाकिस्तानच्या सेनेवर हल्ला करत नाही. त्यामुळे त्यांच्या सेनेकडे यापासून दूर राहण्याचा आणि यात लक्ष न घालण्याचा पर्याय आहे. मात्र पाकिस्तानने या सल्ल्याकडे दुर्लक्ष करण्याचा निर्णय घेतला.

------------

### टेक क्रांतीमध्ये भारताचा

या प्रकल्पांसाठी ३०० कोटी रुपयांचा निधी जारी करण्यात आला आहे. एवढेच नाही तर, ६ जी पेटंट दाखल करण्याबाबत भारत आता पहिल्या ६ देशांमध्ये सामील झाला आहे, अशी माहिती समोर आली आहे. ६ जी पेटंट दाखल करणाऱ्या जगातील टॉप ६ देशांमध्ये भारत देखील सामील झाला आहे. ६ जी आल्यानंतर, इंटरनेट डेटा ट्रान्सफरचा वेग १ टेराबिट प्रति सेकंदापर्यंत पोहोचेल. हे ५ जी पेक्षा १०० पट वेगवान असेल. ६ जी चा वेग ५ जी पेक्षा इतका जास्त असेल, तर तुमची अनेक कामे क्षणार्धात पूर्ण होतील. जसे की मोठ्या फाइल्स काही सेकंदातच डाउनलोड होतील. याशिवाय, इंटरनेट सर्फिंग करताना, व्हिडिओ पाहताना, व्हिडिओ कॉल करताना आणि ओटीटी वर चित्रपट पाहताना तुम्हाला स्लो स्पीडची समस्या येणार नाही. दूरसंचार राज्यमंत्र्यांनी सांगितले की, भारतात प्रतिभावान शास्त्रज्ञ आणि अभियंते आहेत ज्यामुळे भारत ६ जी तंत्रज्ञानात जागतिक नेता बनू शकतो. आमच्याकडे ६ जी च्या संशोधन आणि नवोपक्रमासाठी पुरेसा वेळ आहे. ६जी तंत्रज्ञानामुळे केवळ विद्यमान उद्योगच नव्हे तर अनेक नवीन उद्योगही उदयास येतील.

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. १८ मे २०२५



# र.भ.अट्टल महाविद्यालयात ११ वी ऑनलाईन प्रवेश नोंदणी मदत केंद्राची स्थापना

**गेवराई । प्रतिनिधी**

**यावर्षीपासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ११ वी वर्गाचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. त्याकरिता र. भ. अट्टल महाविद्यालयात ११ वी ऑनलाईन प्रवेश नोंदणी मदत केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना ११ वी वर्गाच्या ऑनलाईन प्रवेशासाठी सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत मदत केंद्र कार्यान्वित राहील.**

विद्यार्थ्यांना प्रवेश नोंदणी करण्यासाठी सहकार्य व्हावे म्हणून र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागामध्ये ११ वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेची प्रवेश नोंदणी करण्यासाठी मदत केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. सदरील केंद्रावर येऊन १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदणी करावी आणि मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. डॉ. रजनी शिखरे यांनी केले आहे.

# नेकनूर शहरात शिवस्मारकासाठी शिवप्रेमी आक्रमक

## ग्रामपंचायतसमोर अजय काळे यांचे आमरण उपोषण सुरू

**नेकनूर । प्रतिनिधी**

**शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे अक्षरूढ स्मारक उभारण्यासाठी नेकनूर ग्रामपंचायत मार्फत जागा देण्यात यावी या मागणीसाठी नेकनुरकर आक्रमक झाले आहेत (दि.१७) शनिवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून अजयसिंह काळे हे या मागणीसाठी उपोषणास बसले आहेत.**




बीड तालुक्यातील नेकनूर शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे अक्षरूढ स्मारक उभारण्यासाठी नेकनूर ग्रामपंचायत मार्फत जागा देण्यात यावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय बीड व नेकनूर ग्रामपंचायत कार्यालय यांना वेळोवेळी पत्र व्यवहार करूनही स्मारक उभारण्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे अजयसिंह भारतराव काळे हे व समस्त शिवप्रेमी नागरिक ग्रामपंचायत कार्यालयासमोर (दि.१७) शनिवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून या मागणीसाठी उपोषणास बसले आहेत.अजूनपर्यंत ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी उपोषणस्थळी भेट दिली नाही.

आज सकाळी १० वाजता उपोषणास सुरुवात केली आहे जो पर्यंत ग्रामपंचायत प्रशासन जागा देत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नाही

**–अजयसिंह भारतराव काळे**

# कुठल्याही थेट युद्धातल्या विजयापेक्षा...; एकनाथ शिंदेंनी केलं पीएम मोदींचं कौतुक

मुंबई । प्रतिनिधी



पहलगामचा माणुसकीला काळीमा फासणारा दहशतवादी हल्ला आणि त्यानंतरच्या काळात भारताने पाकिस्तानचा जगासमोर आणलेला दहशतवादाचा चेहरा हा कुठल्याही थेट युद्धातल्या विजयापेक्षा मोठा विजय आहे असं सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचं कौतुक केले आहे.

ऑपरेशन सिंदूरनंतर केंद्र सरकारने जागतिक स्तरावर दहशतवाद आणि पाकचा चेहरा उघड करण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला. त्यावर एकनाथ शिंदे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरचाच एक भाग म्हणून भारताची दहशतवादविरोधी 'झिरो टॉलरन्स' भूमिका अधिक प्रभावीपणे आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी सात सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळे वेगवेगळ्या राष्ट्रांना पाठवण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनापासून अभिनंदन करतो. ही भारताच्या परराष्ट्र धोरणातील एक ऐतिहासिक पायरी ठरणार आहे. विशेष म्हणजे या शिष्टमंडळांमध्ये देशातल्या सर्व राजकीय पक्षांचा देखील समावेश केल्यामुळे दहशतवाद विरोधात देशाची एकजूट आहे हे चित्र दिसलं असं त्यांनी सांगितले.

# ९०.४० % गुण मिळवत मानसी सचिन शहागडकर हिचे दहावीत घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत बीड येथील संस्कार विद्यालयाची विद्यार्थिनी कु. मानसी सचिन शहागडकर हिने ९०.४० % गुण मिळवत प्रथम येवून घवघवीत यश संपादन केले आहे.

मानसी च्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. ती लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असून तिने विविध शिकवणी मध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या यशामागे तिची चिकाटी, मेहनत, पालकांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात येत आहे. माजी मंत्री जयदत्त आणा क्षीररसागर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनीलदादा जगताप, रा.काँ.श.प. पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, भाजपा जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, भाजपा नेते नवनाथ आणा शिराळे, प्रोफेशनल क्लासेस चेरमन अध्यक्ष पवार सर यांच्या सह शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहर धोंडे यांनी मानसीचे अभिनंदन करून तीला पुढील शैक्षणिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या तर संस्कार विदयालयचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदांनी मानसी चे अभिनंदन करत तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पाडळी हायस्कूलची दहावीच्या १००% निकालाची परंपरा कायम

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

राज्यात शालांत परीक्षा दहावी फेब्रुवारी /मार्च २०२५ संपन्न झाल्या होत्या या दहावी परीक्षेमध्ये पाडळी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवली असुन विद्यालयाचा निकाल १००% घोषीत झाला आहे प्रथम कु. सानप वैष्णवी ९७. ४०% व्दितीय कु. सानप प्रिया ९६ .६०% तृतीय कु. जोगदंड ज्ञानेश्वरी ९६. ४०% या तीन गुणवंत मुलींनी मानाचे स्थान पटकावले आहे दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी विद्यार्थ्यांनी निकालाची परंपरा कायम ठेवून पाडळी हायस्कूलचे नाव रोशन केले आहे या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्तजी क्षीरसागर युवानेते रोहीत क्षीरसागर प्रशासन अधिकारी डॉ राजीव मचाले सहप्रशासक योगेश पवार कार्यवाहक एम ए राऊत प्राचार्य/ मुख्याध्यापक अंगदराव दहिफळे सरपंच गहिनाथ पाखरे माजी सरपंच रामदास हंगे उपसरपंच सुभद्राबाई इंगळे प्रकाश इंगळे ग्रा. प. सदस्य विनोद कंठाळे गोरख सानप नरेश कंठाळे भगवान पाखरे किरण चव्हाण समाधान इंगळे विजय सरवदे शेख आलिम विष्णू हंगे बबन कंठाळे नाथा दुधाळ मच्छिंद्र सानप उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोडंगे माध्यमिक पर्यवेक्षक दिपक रत्नपारखी आदी सह ग्रामस्थांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# राजवर्धन पंडितचे एसएससी परीक्षेत उज्वल यश

गेवराई । प्रतिनिधी



छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलचा विद्यार्थी राजवर्धन रोहित पंडित यांनी मार्च २०२५ मध्ये झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण प्राप्त करून उज्वल यश संपादन केले आहे या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलमध्ये शिक्षण घेणारा राजवर्धन पंडित हा विविध क्षेत्रांमध्ये अग्रेसर असून अनेक स्पर्धेमध्येही त्याने नावलौकिक मिळवलेला आहे. नुकत्याच झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण घेऊन यश संपादन केलेला राजवर्धन पंडित हा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा नातू आणि युवा नेते रोहित पंडित व माजी नगरसेविका स्वरूपाताई पंडित यांचा मुलगा आहे. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, गिरिकाभाभी पंडित, माजी जि प सभापती युधाजित पंडित, सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते रोहित पंडित, सौ स्वरूपाताई पंडित, यशराज पंडित यांच्यासह प्राचार्य व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# संत खंडूजी बाबा विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम; शाळेचा निकाल १०० टक्के

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत घेण्यात आलेल्या माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी – मार्च २०२५ मध्ये संत खंडूजी बाबा विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. विद्यालयाचा निकाल १००% टक्के लागला आहे. महाविद्यालयातून एकूण ३२ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. ३२ पैकी ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी २६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह ०३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ०२विद्यार्थी द्वितीय श्रेणी तर ०१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन यश संपादन केले.**

विद्यालयातून चि. काशीद किशोर अनिल विद्यार्थ्यांने ९२.८०% गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला तर कु.माने श्रावणी सुभाष ९१.८०% गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला,कु.कोळेकर ऋतुजा जयसिंग ९१.२०%तृतीय क्रमांक,कु.गायकवाड श्रावणी रमेश ९१.००% चतुर्थ क्रमांक चि.कोळेकर नागेश अशोक ९०.८०% पाचवा क्रमांक तर कु.दडपे नंदिनी विजय ९०.६०% सहावा क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मुख्यध्यापिका श्रीमती. भालेकर मॅडम तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री.महादेव राऊत व सचिव श्री.सुतार सर तसेच शालेय कमिटी अध्यक्ष व सरपंच यांनी अभिनंदन केले सैदापूर,जोडवाडी, सिंगारवाडी,काजळा, तांदळा,टकलेवाडी, जोडवाडी,मातोरी व श्रीराम संस्थान तींतरवणी,शृंगऋषीगड शृंगारवाडी व परिसरातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी व पालकांनी अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# पद्मश्री शंकरबापू माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के

**कळंब । प्रतिनिधी**

तालुक्यातील हसेगाव ( के) येथील पद्मश्री शंकरबापू माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून शाळेतील आदित्य



लक्ष्मण कुरुंद हा ८०.००% घेऊन प्रथम आला आहे तर द्वितीय प्रिती अंकुश कोल्हे ही ७६.६० % तर अर्पिता लक्ष्मण कोळी ही ७६.२०% तृतीय आली आहे. विशेष प्राविणयासह चार विद्यार्थी व प्रथम श्रेणीत सहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक परमेश्वर पालकर, कोल्हे दत्तात्रय, दराडे बाबासाहेब, हजारे अजित यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा विश्वंभर अप्पा पाटील, मार्गदर्शक विलास पापा पाटील. संस्थेचे सचिव मा किरण पाटील, मुख्याध्यापक परमेश्वर पालकर यांनी अभिनंदन केले.

# सिद्धी विनायक गणपती मंदिर यशवंतनगर येथे संकष्ट चतुर्थीनिमित्त गायत्री यज्ञ संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वार च्या आशीर्वादाने व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने दिनांक १६/०५/२०२५ शुक्रवार वैशाख वद्य संकट चतुर्थी निमित्त "गायत्री यज्ञाचे" आयोजन करण्यात आले होते.या यज्ञाचे यजमान– गायकवाड साहेब सपरिवारअ.वि.गा.परिवार बीड हे होते..**



शिध्दिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड चे अध्यक्ष ॲड मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा यज्ञ करण्यात आला.या गायत्री यज्ञाला पुरोहित म्हणून गायत्री परिवाराचे बीड जिल्हा समन्वयक मोहन महाराज खरमाटे, व रत्नपारखी काका यांनी होते. यावेळी यशवंत नगर मधील असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वीर जवानांसाठी व राष्ट्रासाठी आहुती**: सध्या राष्ट्रामध्ये युद्ध परिस्थिती आहे. या युद्धात काही जवान देशासाठी शहीद झाले. त्याच्यासाठीही आहुती देण्यात आली तसेच राष्ट्राला ही आहुती अर्पण करण्यात आली.

**गर्भ संस्कार**: कालच्या गायत्री यज्ञ वेळी गर्भवती मातेवर गर्भ संस्कार करण्यात आले. व होणाऱ्या बाळा वर काही अरिष्ठ येऊ नये म्हणून ग्रंथराज ज्ञानेश्वरी वाचन करणे, भगवंताचे नामस्मरण,आणि दररोज गायत्री मंत्र पठन करण्यास सांगितले. सामूहिक आरती होऊन कार्य कर्माची सांगता झाली.

# शिरूर कासार येथे श्रध्दांजली – सद्भावना रॅली!

**मानूर । प्रतिनिधी ह्व**



पहेलगाम मधे झालेल्या अतिरेकी हल्यात निष्पाप पर्टकांचा बळी घेतलेल्या घटनेचा बदला म्हणून सिंदूर ऑपरेशच्या माध्यमातून भारतीय सैनिकांनी पाक अतिरेक्यांना सडैतोड उत्तर दिले मात्र दुर्दैवाने यातही काही सैनिकाना आपल्या प्राणाची आहूती द्यावी लागली . निष्पाप बळी गेलेले पर्टटक ,लढ्यात शहीद झालेल्या भारतीय जवानांना श्रद्धांजली व भारतीय सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी शिरूरमधे भाजपा मटक्या विमुक आघाडीच्या युवती प्रदेशाध्यक्षा ॲड भाग्यश्री ढाकणे व सामाजिक कार्यकर्ते अदिनाथ गवळी यांचे माध्यमातून या रॅलीचे आयोजन केले होते ,बसस्टडच्या आवारात भारतमातेच्या प्रतिमेला मा.सैनिक अशोक गिरी यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला,यावेळी पत्रकार संघाने श्रध्दांजली अर्पण केली, शिवसेनेचे तालुका प्रमुख सोपान मोरे,,वारणीचे ज्ञानदेव केदार ,एम एम बडे ,योगिता गवळी , गोकुळ पवार ,जगदिश चेमटे ,सावळेराम जायभाये ,आदीसह मा.सैनिक सहभागी होते ,भाग्यश्री ढाकणे यांनी रॅलीच्या माध्यमातून सैनिकाप्रती आदरभाव व्यक्त केला.

छोट्या मुलीच्या डोळ्यात अश्रू!

अगदी दहा बारा वर्षाची शालेय विद्यार्थीने यावेळी हातात तिरंगा घेऊन भावना व्यक्त केल्या यावेळी तीच्या डोळ्यातील अश्रूने रॅलीमधील सहभागी नागरीक भावविवश झाले होते .

# साने गुरुजी माध्यमिक विद्यालय एसएससी परीक्षेत मारली मुलींनी बाजी

**वडवणी । प्रतिनिधी**



कु.मदने वृषाली दत्तात्रय (प्रथम - 94.40 %) | कु.शेख आयशा अनिस (द्वितीय - 93.80 %) | कु.गायवळ गितांजली दिनकर (प्रथम - 93.20 %)

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (ई.१० वी) परीक्षेचा निकालात परभणी केसापुरी येथील अरुणा असफअली महिला मंडळ संचलित सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयाचा ९५.७५% निकाल लागला आहे. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी एकुण ६० त्या पैकी ५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातुन १)कु. मदने वृषाली दत्तात्रेय९४.४०% प्रथम २)शेख आयशा अनिस९३.८०% द्वितीय ३)गायवळ गीतांजली दिनकर९३.२०% तृतीय ४)वरकड साक्षी धर्मराज ९२.६०% चौथा ५)आनेराव वैष्णवी अशोक ९२.००,% पाचवा ६) नरवडे अंकिता अंगद९१.८०% सहवा ७) शिंदे स्वराज सिद्धेश्वर९१.००% सातवा ८)काळे प्रिती संतोष९०.८०% आठवा ९) कवचट अंजली बिभिषण ९०.४०% नववा १०)मदने आदिनाथ शंकर९०.००% दहावा ११) गायवळ ज्ञानेश्वर८९.८०% अकरावा १२) खरात समृद्धी बालासाहेब८९.००% बारावा १३) वरकड ज्ञानेश्वर राजाराम८८.६०% तेरावा सर्व विद्यार्थी पालक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी गावचे सरपंच ग्रामसेवक शिक्षण प्रेमी नागरिक यांच्याकडून सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन

## पान ६ वरून...

### चाबूक काणी, गवताळ

व्हीएसआय पुणे यांनी शिफारस केलेल्याच ऊस जातीची लागवड करणे बाबत माहिती देऊन ऊस पिकामध्ये सद्यस्थितीत निदर्शनास येत असलेला उंदीर, मावा, कांडी किडीचा प्रादुर्भाव निरीक्षणे दाखवून व्यवस्थापनाच्या उपाययोजना सुचवल्या. नॅचरल शुगरचे संचालक पांडुरंग आवाड यांनी आडसाली ऊस लागवड २०२५-२६ करिता करावयाचे नियोजन बाबत मार्गदर्शन केले. सदर शिवार फेरी उपक्रमामध्ये कारखान्याचे कृषी पर्यवेक्षक ज्ञानेश्वर गायकवाड, वैभव भिसे, स्वप्निल खोसे, कृषी सहाय्यक सचिन देशमुख, जयराज भुजबळ, मेघनाथ माळी, विलास राठोड तसेच शेतकरी विठ्ठल शितोळे, अशोक माचवे, संजय पुदाले, सत्यवान पुदाले, राजाभाऊ खोत, विष्णुपंत टेळे, भैरवनाथ टेळे, रणजीत भिसे, दिलीप शिंदे, बालासाहेब आवाड आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विक्रीला काढलेल्या

दुरुस्तीबाबत प्रस्ताव जिल्हा परिषद बांधकाम यांच्याकडे पाठवलेला आहे.त्यांच्याकडून ही निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यानंतर रस्ता होणार आहे. परंतु रस्त्यावर दोन्ही बाजूने अतिक्रमण झाल्यामुळे अरुंद रस्ता झाला आहे.आज रोजी एकही वाहन त्यामधून जाऊ शकत नाही. तसेच लहान मुले शाळेला जाताना त्यांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे.आज आहे त्या स्थितीत रस्ता झाल्यास भविष्यात वनवेवाडी ग्रामस्थांच्या अडचणीत भर पडणार असल्याने पूर्वी असलेला चाळीस फुटाचा रस्ता करून द्यावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली.याबाबत याबाबत पुढील आठवड्यात मोजणी करून मोजणी अंती अतिक्रमण काढण्यात येईल व त्यानंतर आपला रस्ता होईल असे सर्व ग्रामस्थांना आश्वासित करण्यात आलेले आहे याकरिता वनवेवाडी ग्रामपंचायत वनवेवाडी ग्रामस्थ या सर्वांचीच प्रशासनाला मदत भासणार आहे.अतिक्रमण काढत असताना अतिक्रमणाची कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात येईल परंतु यासाठी लागणारे साधन सुविधा ग्रामपंचायत वनेवाडी यांनी तयार ठेवावी असे सांगण्यात आले असल्याचे तहसिलदार वैशाली पाटील यांनी सांगितले.

# जिनिअस क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील जिनिअस क्लासेस च्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या उइडए व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेत अत्युच्च यश संपादन करत संस्थेच्या शैक्षणिक कार्यक्षमतेला सिद्ध केलं आहे.

CBSE बोर्ड परीक्षेत यशराज योगेश सोलाट याने ९६.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला त्याचबरोबर समृद्धी अमोल करांडे – ९६.२०% (द्वितीय), तर जितिशा सागर वाधवाणी आणि आदित्य मुकुंद कराड – ९३.६०% गुणांसह तृतीय सहविजेतेपद मिळवले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य मंडळाच्या परीक्षेत श्वेता अशोक भोजगुडे हिने ९७.८०% गुणांसह प्रथम क्रमांक, प्रथमेश प्रकाश आतकरे – ९५.४०% (द्वितीय), आणि सृष्टी राजेंद्र मचे व सुप्रिया कल्याण सातपुते – ९४.६०% गुणांसह तृतीय सहविजेतेपद मिळवले.



या अपूर्व यशाबद्दल जिनिअस क्लासेस चे संस्थापक सुनिल चाळक, कार्यकारी संचालक नारायण चाळक, तसेच शिक्षकवर्गातील पवन मस्के, अमृता पाथ्रीकर, गजानन औटी आणि अमोल आहेर यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.या यशामागे विद्यार्थ्यांची चिकाटी, दर्जेदार मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.जिनिअस क्लासेसकडून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

cmyk

# ‘पीएम किसान’चा विसावा हप्ता जूनमध्ये

राज्यातील ९३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना पंतप्रधान (पीएम) किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता जूनमध्ये मिळण्याची शक्यता आहे. ‘पीएम किसान’मधील नवी नोंदणी किंवा आधीच्या नोंदणीतील अडचणी दूर करण्यासाठी कृषी विभागाने गावपातळीवर घेतलेल्या मोहिमांना चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे गेल्या हप्त्याच्या तुलनेत यंदा लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या वाढेल. ही संख्या किमान ५० हजारांनी वाढून ९३.३५ लाखांच्या पुढे जाणार आहे. राज्यात एकोणिसावा हप्ता मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या ९२.८९ लाख इतकी होती.

एक हजार ९६७ कोटींहून अधिक रक्कम वाटली गेली होती. विसाव्या हप्त्याची रक्कम यापेक्षाही जास्त राहील. कारण, भूमी अभिलेख नोंदी, ई-केवायसी व बँक खाती आधार संलग्न केलेल्या शेतकऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे पात्र लाभार्थी संख्या आता ९३.३५ लाखांच्या पुढे गेली आहे. पीएम किसान योजनेचा लाभ मिळण्यासाठी केंद्र शासनाने घर बसल्या ऑनलाइन नोंदणीची सुविधा दिली आहे. त्याचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांनी संख्या ३५ लाखांच्या पुढे गेली आहे. कृषी विभागाच्या



म्हणण्यानुसार, कोणत्याही यंत्रणेची मदत न घेता १४ मेअखेर राज्यातील ३५.५१ लाख शेतकऱ्यांनी स्वयंनोंदणी पूर्ण केली. यात पुणे व सांगली या दोन जिल्ह्यांनी आघाडी घेतली आहे. या जिल्ह्यांमधून प्रत्येकी दोन लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी घरबसल्या गावशिवारातून पीएम किसानची नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली. उर्वरित शेतकऱ्यांनी मात्र सार्वजनिक सुविधा केंद्रांची (सीएससी) मदत घेत नोंदणी केली आहे.

...असा तपासा हप्त्यांचा तपशील

‘पीएम किसान’च्या सर्व हप्तांचा तपशील ऑनलाइन तपासता येतो. त्यासाठी https:// pmkisan.gov.in ho संकेतस्थळ शेतकऱ्याला मदत करते. तेथे लॉगइन होताच डाव्या बाजूला ‘बेनिफिशरी लिस्ट’ येथे क्लिक करावे. त्यानंतर तुमचे राज्य, जिल्हा, उपविभाग, गट आणि गाव निवडावे. त्यानंतर ‘गेट रिपोर्ट’वर क्लिक करताच लाभार्थ्यांच्या हप्त्यांचा तपशील अधिकृतपणे प्राप्त होतो.

नोंदणी मोठी; मात्र क्रियाशील कमी

केंद्र शासनाने २० वा हप्ता जूनमध्ये मिळेल, याचे संकेत दिले आहेत. मात्र निश्चित तारीख अद्याप जाहीर केलेली नाही. पीएम किसान योजनेच्या आतापर्यंतच्या सलग १९ हप्त्यांपोटी एकूण ३५ हजार ५८६ कोटी रुपये वाटण्यात आलेले आहेत. या योजनेसाठी राज्यभरातून १२३ लाखांहून जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. परंतु त्यापैकी पीएम किसानच्या संकेतस्थळावर क्रियाशील असलेले शेतकरी केवळ ९७.६६ लाख आहेत. अर्थात, त्यापैकी ७९ हजार शेतकऱ्यांनी भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या नाहीत. तसेच १.९८ लाख शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आधार क्रमांक आपापल्या बँक खात्याशी संलग्न केलेला नाही. त्यामुळे असे अडीच लाखांहून शेतकरी अजूनही लाभाच्या बाहेर आहेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९८ : वास्को-द-गामा भारतातील कालिकत बंदरात दाखल झाला.
१८०४ : नेपोलिअन बोनापार्ट फ्रान्सचा सम्राट झाला.
१९१२ : पूर्णपणे भारतात बनवलेला मूकपट ’पुंडलिक’ प्रदर्शित झाला.
१९३८ : ’प्रभात’चा ’गोपालकृष्ण’ हा चित्रपट मुंबईच्या ’सेंट्रल’ सिनेमात प्रदर्शित झाला.
१९४० : ’प्रभात’चा ’संत ज्ञानेश्वर’ हा चित्रपट मुंबई व पुणे या ठिकाणी एकाच दिवशी प्रदर्शित झाला.
१९७२ : कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना.
१९७२ : दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना झाली.
१९७४ : भारताने पोखरण येथे आण्विक अस्त्राची पहिली यशस्वी चाचणी केली.
१९९० : फ्रान्स च्या टीजीव्ही रेल्वे ने ५१५.३ किमी/ताशी वेगाने धावण्याचा नवीन जागतिक विक्रम केला.
१९९१ : रशियाच्या सोयुझ अंतराळातुन भ्रमण करणारी हेलन शेरमन ही महिला पहिली ब्रिटिश अंतराळयात्री बनली.
१९९५ : स्थानिक ठिकाणचे ५,००० रुपयांपर्यंतचे धनादेश खात्यात भरल्यानंतर तिसर्या दिवशी ती रक्कम ग्राहकास काढण्याची मुभा द्यावी, असा आदेश ’रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया’ने दिला.
१९९८ : पुण्याच्या सुरेन्द्र चव्हाणने जगातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर सर केले.
२००८ : भारतीय पार्श्वगायक नितीन मुकेश यांना मध्यप्रदेश सरकारने भारतीय राष्ट्रीय पुरस्कार लता मंगेशकर देऊन त्यांचा सन्मान केला.
२००९ : श्रीलंका सरकारने एलटीटीई ला पराभूत करून सुमारे २६ वर्षच्या युद्धाला संपवले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०४८ : ओमर खय्याम पर्शियन तत्त्वज्ञ, गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ आणि कवी (मृत्यू: ४ डिसेंबर ११३१)
१६८२ : छत्रपती शाहूराजे भोसले, संभाजीराजे व माहाराणी येसुबाई यांचे पुत्र.
१८५३ : ब्रिटीश कालीन भारतातील भारतीय कवी, साहित्यकार, लेखक आणि समाजसुधारक तसचं, महिलांच्या हक्काचे रक्षणकर्ते व बालविवाहविरोधक उत्कृष वकील बहरामजी मेरवानजी मलबारी यांचा जन्मदिन.
१८७२ : ब्रिटिश गणितज्ञ, तत्त्वज्ञ आणि इतिहासकार बर्ट्रांड रसेल यांचा जन्म. (मृत्यू: २ फेब्रुवारी १९७०)
१९१३ : पुरुषोत्तम काकोडकर गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, काँग्रेसचे नेते, ५ व्या लोकसभेचे सदस्य (मृत्यू: २ मे १९९८)
१९१४ : भारतीय रिजर्व बँकेच्या दहाव्या गव्हर्नर एस. जगन्नाथ यांचा जन्मदिन.
१९२० : पोप जॉन पॉल (दुसरा) (मृत्यू: २ एप्रिल २००५)
१९२२ : नार्वे देशातील मानसोपचारतज्ञ जर्डा बोयेसन यांचा जन्मदिन.
१९३३ : एच. डी. देवेगौडा, भारताचे अकरावे पंतप्रधान.
१९७७ : भारतीय इलेक्ट्रिकल्स लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व भारतीय उद्योग व्यवस्थापक अनंत बजाज यांचा जन्मदिन.
१९७९ : माईनक्राफ्ट या गेम चे सहसंस्थापक जेन्स्? बर्गेस्टन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८०८ : बोर्नबॉन व्हिस्की चे निर्माते एलीया क्रेग यांचे निधन.
१८४६ : मराठी पत्रकारितेचे पितामह बाळशास्त्री जांभेकर यांचे निधन. (जन्म: ६ जानेवारी १८१२)
१९६६ : वनस्पतीशास्त्रज्ञ पंचानन माहेश्वरी यांचे निधन. (जन्म: ९ नोव्हेंबर १९०४)
१९८६ : कानरू लक्ष्मण राव, स्थापत्य अभियंता.
१९९७ : कमलाबाई रघुनाथराव गोखले, पहिल्या स्त्री चित्रपट कलाकार.
१९९९ : पहिले राष्ट्रीय बुद्धीबळ विजेते रामचंद्र सप्रे यांचे निधन.
२००९ : एल. टी. टी. ई. चे संस्थापक वेलुपल्ली प्रभाकरन यांचे निधन. (जन्म: २६ नोव्हेंबर १९५४)
२०१२ : भारतीय धार्मिक नेते जय गुरूदेव यांचे निधन.
२०१७ : भारतीय अभिनेत्री रीमा लागू यांचे निधन. (जन्म: २१ जुन १९५८

# जमनापुरी जातीच्या शेळ्या पाळा; लाखोंचे उत्पन्न मिळवा



जमनापारी जातीच्या शेळीचे दूध लवकर खराब होत नाही. या जातीच्या शेळ्या दररोज सुमारे ४ ते ५ लिटर दूध देतात. त्याच वेळी या जातीचा स्तनपान कालावधी सुमारे १७५ ते २०० दिवस आहे आणि ही शेळी एका स्तनपानात ५०० लिटर पर्यंत दूध देते. याशिवाय शेळ्यांची जात सुधारण्यासाठी परदेशातील शेळीपालक भारतातून जमनापारी जातीची आयात करतात.

देशी-विदेशी बाजारपेठेत शेळयांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पहिले तर मांस आणि दुधासाठी शेळ्या पाळल्या जात आहेत. त्याची मागणी बाजारात नेहमीच असते. अशा परिस्थितीत चांगल्या जातीच्या शेळ्या-मेंढ्या पाळल्या तर दर महिन्याला चांगले उत्पन्न मिळू शकते. यामुळे पशुपालकांसाठी आज आम्ही एका चांगल्या जातीच्या शेळीची माहिती घेऊन आलो आहे. ज्याची दररोज चार ते पाच लिटर दूध देण्याची क्षमता आहे. ज्या शेळीच्या जातीबद्दल बोलत आहोत ती म्हणजे जमनापारी जातीची शेळी. या जातीच्या शेळ्यांचे वजन दररोज सुमारे १२० ते १२५ ग्रॅम वाढते.

जमनापारी जातीच्या शेळीची किंमत : जमनापुरी जातीच्या शेळीचे दूध लवकर खराब होत नाही. या जातीच्या शेळ्या दररोज सुमारे ४ ते ५ लिटर दूध देतात. त्याच वेळी या जातीचा स्तनपान कालावधी सुमारे १७५ ते २०० दिवस आहे आणि ही शेळी एका स्तनपानात ५०० लिटर पर्यंत दूध देते. याशिवाय शेळ्यांची जात सुधारण्यासाठी परदेशातील शेळीपालक भारतातून जमनापारी जातीची आयात करतात. या जातीच्या ५० टक्के शेळ्या सुमारे दोन मुलांना जन्म देण्यास सक्षम असतात. दूध, मांस, मुलांना जन्म देणारी आणि तिच्या शरीराचा आकार यामुळे जामनापारी जात बाजारात प्रसिद्ध आहे. या जमनापारी जातीच्या शेळ्यांची किंमत सुमारे १५ ते २० हजार रुपये आहे.

जमनापुरी जातीच्या शेळीची वैशिष्ट्ये : जमनापुरी जातीच्या शेळ्यांचा रंग पांढरा असतो. या जातीच्या शेळीला त्याच्या स्वादिष्ट मांसामुळे देशी-विदेशी बाजारपेठेत मागणी आहे. भारतात जमनापारी जातीच्या शेळ्या बहुतेक उत्तर प्रदेशातील इटावा भागात आढळतात. त्याचबरोबर या जातीच्या काही शेळ्या बिहार, राजस्थान आणि पश्चिम बंगालमध्येही दिसतात.

# पाणंद, शेतरस्त्यांसाठी ‘मोजणी फी’ रद्द

पुणे : राज्यातील विविध गावांतील पाणंद, शेतरस्ते खुले करण्याची मोहीम वेगाने राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने पाणंद, शेतरस्त्यांच्या मोजणीसाठी फी न आकारण्याचा निर्णय घेतला असून, तसे पत्र भूमिअभिलेख विभागाला दिले आहे. त्यामुळे आता शेतरस्त्यांसाठी मोजणीचे शुल्क शेतकऱ्यांना भरावे लागणार नाही. या निर्णयामुळे रस्ते खुले करण्याच्या कामास गती येणार आहे.

सध्या जिल्ह्यात अतिक्रमित झालेले रस्ते, तसेच रस्त्याची हद्द कुठे आहे, हे समजण्यासाठी या रस्त्यांची मोजणी करावी लागते. या मोजणीसाठी शेतकऱ्यांना भूमिअभिलेख विभागाकडे ‘मोजणी फी’ भरावी लागत होती.त्यामुळे ‘मोजणी फी’ अभावी हे रस्ते खुले होण्यास अडचणी येत होत्या. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वहिवाट रस्ते, ग्रामीण रस्ते, हद्दीचे रस्ते खुले करण्याची अनेक प्रकरणे प्रलंबित आहे. रस्ते खुले करण्यासाठी काही प्रकरणांमध्ये मोजणी फी कोणी भरायची




यावरूनसुद्धा प्रकरणे प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी एक परिपत्रक काढून तहसीलदार यांनी मोजणी करून रस्ते खुले करण्याकरिता गावनिहाय नियोजन करावी. याची कल्पना भूमिअभिलेख व पोलिस निरीक्षक यांना देण्यात यावी, अशा सूचना दिल्या आहेत.

अतिक्रमित रस्ते होणार मोकळे

तालुक्यातील पायमार्ग तुटक रेषेने दर्शविलेले असून, या पायमार्गाची रुंदी सव्वा आठ फूट इतकी निश्चित आहे. तर गाडी मार्गाची रुंदी १६.५ ते २१ फुटांपर्यंत निश्चित केलेली आहे. त्यानुसार असे अतिक्रमित रस्ते मोकळे करण्यात येणार आहे.

# या जातीच्या मुळ्याची लागवड करा ; मिळेल भरघोस नफा




सध्या शेतकरी वेगेवेगळ्या पिकांची लागवड करून चांगले उत्पन्न घेत आहेत. कमी खर्चामध्ये शेतकरी जास्त नफा मिळवत आहेत. यासाठी शेतकरी नवनवीन पिकांची लागवड करण्यास प्राधान्य देतात. आपल्याकडे अनेकजण मुळा शेती देखील करतात आणि यामधून चांगला नफा कमावतात. बऱ्याचदा मुळा शेतीती परवड नसल्याचे देखील अनेक शेतकरी म्हणतात. मात्र यामध्ये न परवडण्याचं कारण म्हणजे तुम्ही मुळा लागवड करताना योग्य वाणाची लागवड करत नाहीत. त्यामुळे तुम्हाला यामध्ये परवडत नाही.

योग्य वाणाची निवड महत्वाची :योग्य वाणाची लागवड केली तर यामधून चांगला फायदा मिळतो. कोणत्याही पिकाची लागवड करायची म्हंटल की योग्य वाणाची निवड करणे गरजेचे आहे. तसेच मुळा लागवड करताना देखील योग्य वाणाची लागवड करणे गरजेचे आहे. भारतीय कृषी संशोधनाने मुळ्याच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. त्यामध्ये पुसा चेतकी आणि पुसा मृदुला या जातींची लागवड करून तुम्ही चांगले उत्पादन घेऊ शकता. पुसा चेतकी व पुसा मृदुला या जातींची लागवड कमी वेळात लवकर होते. या जातीच्या मुळ्याची पाने एकसारखी हिरवी व न कापलेली असतात व त्याची पाने भाजीमध्ये वापरतात. या जातीचे उत्पादन ३५ ते ४० पर्यंत मिळते. पुसा चेटकीची मुळं २५ ते ३० सेंमी लांब, खायला खूप चवदार असतात. परिमाणी याला बाजारात देखील मोठी मागणी असते आणि बाजारात मागणी असल्यामुळे याला भाव देखील चांगला मिळतो.पुसा मृदुला :मुळ्याची पुसा मृदुला ही जात गोलाकार व लाल रंगाची असते. तसेच ही जात फार कमी वेळात तयार होते. त्याच्या तयार होण्याचा कालावधी २८ ते ३२ दिवसांचा असतो. मुळ्याचे मूळ हे कमी असते. मात्र यातून उत्पादन जास्त निघते. याच्या लागवडीसाठी चुनखडी किंवा चिकणमाती माती त्याच्या पेरणीसाठी चांगली मानली जाते. ती मेडवर देखील पेरली जाऊ शकते. याची लागवड करताना ज्या शेतात पाणी साचणार नाही त्या ठिकाणी लागवड करावी.

# केळी बागेतील रोगांचा प्रादुर्भाव टाळण्याचे उपाय

महाराष्ट्रात केळी लागवड प्रामुख्याने जून-जुलै महिन्यांत केली जाते. जून - जुलै महिन्यात लागवड केलेल्या केळी बागेला मृग बाग असे म्हणतात. मृग बाग लागवडीतील केळी घड उन्हाळी हंगामात काढणीस तयार होतात. विविध कारणांमुळे मृग बागेचं नुकसान जास्त प्रमाणात दिसून येते. केळी बागेत प्रामुख्याने करपा म्हणजेच सिगाटोका या बुरशीजन्य आणि कुकुंबर मोझॅक या विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यापैकी कुकुंबर मोझॅक म्हणजेच सीएमव्ही या विषाणूजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे केळी बागेचं मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

हा रोग लागवडीच्या सुरुवातीला येतो. नुकसान जास्त होत असल्यामुळे रोग नियंत्रणासाठी रोप पूर्ण उपटून नष्ट करावे लागते. यामध्ये मृग बाग लागवडीची वेळ काटेकोरपणे पाळणे अत्यंत आवश्यक आहे. मृग बाग केळी लागवड ही मे महिन्याचा शेवटच्या आठवड्यात किंवा जून महिन्यात करावी. जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात केळीची लागवड करणे टाळावे. केळीची लागवड ही गादीवाफ्यावर करावी. गादीवाफ्यावर लागवड केल्यामुळे मुळांची वाढ चांगली होऊन झाडांची वाढही चांगली होते. त्यामुळे साहजिकच घडांची वाढ चांगली होऊन ते वजनानं देखील जास्त भरतात. वेळोवेळी बागेत हलकी टिचणी करून झाडांना भर देत राहावे. त्यामुळे वादळी वाऱ्यामुळे झाडे पडण्याचं प्रमाण कमी होते. रोग व्यवस्थापनामध्ये लागवडीचे अंतर ही अत्यंत महत्त्वाची बाब असते. केळी फळपिकात ‘श्रीमंती’ व ‘फुले प्राइड’ यांसारख्या बुटक्या वाणांची लागवड दीड बाय दीड मीटर अंतरावर करावी. तर ‘ग्रॅडनैन’ या उंच वाढणाऱ्या वाणाची १.७५ मीटर बाय १.७५ मीटर अंतरावर लागवड करावी. योग्य अंतरावर लागवड केल्यामुळे बागेत हवा खेळती राहून बाग निरोगी राहण्यास मदत होते. दाट लागवडीमुळे सिगाटोका आणि सीएमव्ही रोगाच्या प्रादुर्भावास अनुकूल वातावरण निर्मिती होते. कंदापासून लागवड करताना कंद निरोगी बागेतूनच निवडावेत. लागवडीपूर्वी शिफारशीप्रमाणे कंद प्रक्रिया करावी. शेतकऱ्यांचा कल हा ऊतीसंवर्धित रोपांकडे जास्त असतो. मुळातच उतिसंवर्धित रोपे नाजूक असल्याने ती रोगास सहज बळी पडतात. उतिसंवर्धित रोपांची लागवड करताना रोपे उत्तम दुय्यम कणखरता असलेली आणि ४ ते ५ पान असलेली निवडावीत. छोटी, कमी पाने असलेली पुरेशी कणखरता नसलेल्या रोपांची लागवडीसाठी निवड करू नये. बरेच शेतकरी केळी लागवडीवेळी सजीव कुंपण लागवडीकडे दुर्लक्ष करतात. बागेभोवती दुहेरी ओळीत शेवरी पिकाची सजीव कुंपण म्हणून लागवड करण्याची शिफारस केली आहे. अशाप्रकारे केळीची लागवड करताना काळजी घेतल्यास केळी बागेपासून चांगले उत्पादन मिळू शकेल.



# बसमध्ये महिला छेडछाडीमुळे गोंधळ; महिलांना बसमध्ये मारहाण

## बार्शी नाक्यावर बसची काच फोडली,वाहतूक ठप्प, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

बीड प्रतिनिधी

शहरातील बार्शी नाका चौकात आज दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सोलापूरहून बीडकडे येणाऱ्या बसमध्ये महिला प्रवाशाच्या छेडछाडीच्या घटनेमुळे मोठा गोंधळ उडाला. बस (क्रमांक ०९ ०९६८) बार्शी नाका चौकात आल्यानंतर पीडित महिलेने आपल्या नातेवाईकाला घटनास्थळी बोलावून घेतले. संबंधित व्यक्तीस बसबाहेर काढण्याचा प्रयत्न होत असताना बसमधील गर्दी आणि तणाव पाहून बस चालक व कंडक्टरने बसचे दरवाजे बंद करून घेतले.

यामुळे संतप्त जमावाने बससमोर येत ती अडवली आणि बसच्या समोरील काच फोडली. काही वेळातच बार्शी नाका चौकात मोठी गर्दी झाली आणि परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.घटनेची माहिती मिळताच पेठ बीड पोलीस ठाण्याचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि जमाव पांगवण्याचा प्रयत्न सुरू केला. या गोंधळामुळे बार्शी नाका चौकात काही वेळ वाहतूक कोंडी झाली होती.

पीडित महिलेने सांगितले की, ''मी बस थांबवण्यासाठी विनवणी करत होते, पण बस थांबत नव्हती. त्यामुळे मी आरडा-ओरड केली, त्यानंतर लोक जमले आणि त्यांनी बस थांबवली.'' या घटनेमुळे प्रवासी आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पोलीस अधिक तपास करत असून, दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.



## आष्टी येथील मंगल कार्यालयात दागिणे चोरणारी टोळी सक्रीय ?

### महिनाभरात तीनहून अधिक घटना; पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची गरज

आष्टी । प्रतिनिधी

शहर व परिसरातील मंगल कार्यालयांमध्ये आयोजित विवाह सोहळ्यात गेल्या काही दिवसांपासून किमती दागिने चोरणारी टोळी सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. वऱ्हाडी मंडळी लग्नकार्यात व्यस्त असल्याची संधी साधून चोरटे सोन्याचे दागिने व रोख रकमा लंपास करू लागले आहेत. आष्टी ठाण्यात या प्रकरणी महिनाभरात तीन ते चार घटना घडल्या आहेत. दि.१४ मे रोजी दुपारी आणखी अशाच प्रकारची घटना घडली आहे. लग्नात वधूसाठी खरेदी केलेले एक लाख ५९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे विविध दागिने चोरट्यांनी हातोहात लंपास केले

वारंवार घडणाऱ्या अशा प्रकारच्या घटनांमुळे मंगल कार्यालयात दागिने चोरणाऱ्या चोरट्यांची टोळी सक्रिय झाल्याची चर्चा होऊ लागली आहे. आष्टी पोलिसांनी घडलेल्या घटना लक्षात घेता दागिणेचोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे. याबाबत महेश किसन पवार (रा. कुसळंब ता. पाटोदा) यांनी १५ मे रोजी आष्टी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यांचे भाऊ गोविंद पवार यांचा १४ मे रोजी आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. लग्नात वधूला घालण्यासाठी पवार कुटुंबियांनी सोन्याचे दागिने खरेदी केले होते. मात्र लग्न लागण्याच्या मुहूर्तावर ते दागिने दुपारी पावणेएकच्या सुमारास अज्ञातांनी चोरून नेले. यामध्ये २३ हजार रुपये किमतीचा एक झुंबर जोड, २५ हजार रुपये किमतीचे मिनी गंठण, ९० हजार रुपयांचे साखळी गंठण, १६ हजार ५०० रुपये किमतीचे मण्यांचे गंठण व चार हजार ५०० रुपये किमतीची एक अंगठी असे एकूण एक लाख ५९ हजार रुपयांचे दागिने चोरट्यांनी मंगल कार्यालयातून लंपास केले. या प्रकरणी महेश पवार यांच्या फिर्यादीवरून आष्टी ठाण्यात अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदित्य फार्मसीचा ऋषिकेश मोहाळे राज्यात तिसरा

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदित्य फार्मसी बीड चा विद्यार्थी ऋषिकेश मोहाळे याने राज्यातून तिसरा क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन केले. तर संचालक डॉ.आदित्य सारडा यांनी ऋषिकेशचा संस्थेच्या वतीने सत्कार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, रायगड येथे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातून ७५९ विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी व्यासपिठावर पद्मश्री मिलिंद कांबळे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, डॉ. अरविंद किवलेकर, डॉ. एस. एल. नलबलवार,डॉ. विलास सरगडे, डॉ. गणेश वरखडे, डॉ. चंद्रकुमार बडोले, अशोक पवार यांची प्रमुख उपस्थितीत होती. पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या विकासाकरिता आर्थिक दृष्टीकोन यावर आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लोखंडे यांनी तर आभार कुलसचिव डॉ. अरविंद किवलेकर यांनी मानले. महाविद्यालयात ऋषिकेश मोहाळे याचा संस्थेच्या वतीने संचालक डॉ. आदित्य सारडा यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कुमार सुरवसे, विभाग प्रमुख प्रा. समीर देशमुख, प्रा. सुनील मोराळे, प्रा. विठ्ठल मुळे, प्रा. भाग्यश्री भोसले, प्रा. कोमल डोंगरे आदींची उपस्थिती होती.



### गुणवत्ता ही संस्थेची ओळख

आदित्य शिक्षण संस्थेतील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या गुणवत्तेच्या बळावर आज देशात आणि परदेशात चांगल्या पदावर नोकरीला आहेत. अनेक जण स्वात:ची कंपनी स्थापन करून इतरांना रोजगार देत आहेत. आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थी घडतात याचा अभिमान आहे. गुणवत्ता हीच खरी आदित्य शिक्षण संस्थेची ओळख आहे. पुन्हा एकादा राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेत ऋषिकेश मोहाळे या विद्यार्थ्याने यश मिळवून ती दाखवून दिली आहे.

-डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था

## जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश

वडवणी । प्रतिनिधी

कवडगाव (बु.)ता . वडवणी जिल्हा बीड येथील जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे दैदिप्यमान यश नुकत्याच जाहीर झालेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत आपल्या दैदिप्यमान निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत पुन्हा एकदा ग्रामीण भागातून सर्वोत्कृष्ट होण्याचा बहुमान मिळविला आहे . () चा एकूण निकाल शे ९७.६७% तर () चा एकूण निकाल शे ८६.४८ % इतका लागला आहे .विशेष प्रविण्या सह प्रथम द्वितीय श्रेणी मध्ये विद्यार्थी यशवंत झाले आहेत . विद्यालयातून () उच्च माध्यमिक विभागातून सर्व प्रथम येण्याचा मान कु.

१ शेख मुस्कान युसुफ ८२.६७% प्रथम

२) पवार स्वाती विठ्ठल ८०.००% द्वितीय

३) शेख सायमा हसन ७९.६७% तृतीय

या गुणानुक्रमे उत्तीर्ण झाले असून. () माध्यमिक विभागातून सर्व प्रथम येण्याचा मान १) शेजाळ रूपाली अभिमान ८५.४०% प्रथम २) शेख उम्मेअक्सा युसुफ ८३.००% द्वितीय ३) पठाण मोहम्मद फिरोज ८२.००% तृतीय ४) बंडगर पूजा रामकिसन ८०.६०% चतुर्थ ५) शेख सदफ




हाफीज ७९.६०% पाचवा क्रमांक मिळाला असून

या यशाबद्दल व सर्व यशस्वी आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक संस्थेच्या अध्यक्षा व आमचे मार्गदर्शक प्रा. सुशिला ताई मोराळे व अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलितचे सचिव साहेब डॉ. अजित पाखरे श्री. शिवराज दादा पाखरे तसेच संस्थेचे पदाधिकारी तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक/प्राचार्य श्री.सारोक्ते डी जी , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद श्री.घाडगे एस डी श्री.टाळे एच पी श्री.हंगे एस एस श्री. यादव एस एन श्री. मुंडे एस एच श्री. येवले बी बी श्री. चोपडे एस के श्रीमती. तौर एस बी श्री. गोंदरे जी एम श्री. पाखरे व्हि.जी श्री. काळे व्ही डी श्री.ससाणे जी एल तसेच गावातील सर्व मान्यवर सरपंच उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी ग्रामसेवक पालक वृंद शिक्षण प्रेमी जेष्ठ नागरीक व माजी विद्यार्थी मंडळ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे. ग्रामीण भागात सातत्याने आपल्या गुणवत्ता आणि दर्जेदार व्यवस्थापन यासाठी शाळेचे व यशस्विताचे याप्रसंगी या निकालाबाबत संपूर्ण पंचक्रोशीतील शिक्षण प्रेमी नागरिक यांनी कौतुक व अभिनंदन केले तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहे.

## सानिका देवकर, रोहण देवकरचे दहावीच्या परीक्षेत यश





बीड । प्रतिनिधी

सेंट झेवियर्स स्कूल, गेवराई च्या सानिका संतराम देवकर हिने दहावीच्या परीक्षेत ९४.६० टक्के तर व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीडच्या रोहन बप्पासाहेब देवकर या विद्यार्थ्याने ९१.४० टक्के घेऊन यश संपादन केले. या यशाबद्दल दोघांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दिमाख वाडी तालुका गेवराई येथील सानिका संतराम देवकर या विद्यार्थीनिने मराठीमध्ये ९१, हिंदी ८४, इंग्रजी ९६, गणित ९६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ८९, सामाजिक विज्ञान ९८ गुण मिळवत यश संपादन केले. तर रोहण बप्पासाहेब देवकर याने मराठीमध्ये ८८, संस्कृत ९३, इंग्रजी ८७, गणित ७६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ९६, सामाजिक विज्ञान ९३ गुण मिळवले आहेत. या यशाबद्दल सानिक आणि रोहनचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## तुलसी समूहाच्या वतीने दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

वाचन हेच खरे ज्ञानाचे द्वार असून विद्यार्थ्यांनो, वाचनाला प्राधान्य द्या, पुस्तकांच्या जगात प्रवेश करा आणि ज्ञानाच्या नव्या क्षितिजांचा शोध घ्या! हीच यशाची पहिली पायरी आहे, असा संदेश देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात दिला.फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये माध्यमिक शालांत इयत्ता १० वी आणि उच्च माध्यमिक इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परिक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने दि. १६ मे २०२५ रोजी बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोल्त होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अद्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.मस्के एल.एम.,प्रा.संजय घाडगे यांचेसह तुलसी इंग्लिश स्कुलच्या प्राचार्या उमा जगतकर, तुलसी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा प्रकाश ठोकणे आदी उपस्थित होते.





पुढे बोलतांना प्रा.प्रदीप रोडे यांनी सांगितले की, करिअरच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळणे गरजेचे आहे, कारण तो वेळेचा मोठा दुष्प्रयोग करतो. त्याऐवजी पुस्तकांचे वाचन केल्यास मौलिक ज्ञान मिळते आणि नवीन कल्पनांना उत्तेजन मिळते. विद्यार्थानो लक्षात ठेवा, जगातील अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी मानवाने शास्त्र, तंत्रज्ञान आणि संशोधनाद्वारे शक्य केल्या आहेत. म्हणून, कोणत्याही अडचणीला अडथळा न समजता ती दूर करण्याचा प्रयत्न करा.आजपासूनच तयारी सुरू करा, ज्ञान मिळवा आणि स्वतःला नव्या संधींसाठी सज्ज करा! असे सांगत विद्यार्थ्यांनी मिळालेल्या यशावर समाधान न मानता यापेक्षाही उज्ज्वल यश मिळवावे यासाठी शुभेच्छा दिल्या. माध्यमिक शालांत परीक्षेत तुलसी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी राहुल बेलूरे हा ९३.२०% टक्के गुण मिळवून शाळेतून पहिला आला. असलेशा मुंडे ९२.८० टक्के गुण मिळवून दुसरी आली. तर, कुलदीप वाघमारे ९६.४० गुण मिळवून तिसरा आला. तर, उच्च माध्यमिक परीक्षेत तुलसी कनिष्ठ महाविद्यालयातील अथर्व मनोज दुगम (प्रथम क्रमांक) शब्दुली किरण कुलकर्णी( द्वितीय) वैभवी भूषण कुलकर्णी (तृतीय) कला शाखेतून वैष्णवी विनोद ठोंबरे (प्रथम क्रमांक) श्वेता विकास राऊत (द्वितीय) सुहानी गंगाधर सोनवणे (तृतीय) तर वाणिज्य शाखेतून संजना मल्लिकार्जुन आर्यनकर (प्रथम क्रमांक) अंकिता हरिदास आवटे (द्वितीय) मुंजाराम अशोक तूपसागर (तृतीय)आले आहेत, या सर्व विद्यार्थ्यांचा पुष्पगुछ व ''जग बदलणारा बाप माणूस'' हे प्रेरणादायी पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला तसेच शालांत परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणारे शाळेतील ०७ विद्यार्थी, उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणारे १२ विद्यार्थी, उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा प्रकाश ढोकणे, सूत्रसंचालन कोमल मस्के, जे.जी. पवार मॅडम यांनी केले तर आभार प्रीती कांबळे यांनी मानले.कार्यक्रमास प्रा.अजिनाथ मस्के, प्रा.प्रकाश गायकवाड, प्रा.हनुमंत विद्यागर, प्रा.सागर सोनवणे, प्रा.निलेश जाधव, प्रा.गणेश काळे, कार्यालयीन कर्मचारी महेश उड्डाण यांचेसह मोठ्या संख्येने पालकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## आष्टी तालुक्यात बालविवाह धूम धडाक्यात सुरु

### तालुका बाल संरक्षण समितीची एक वर्षापासून बैठकच नाही;काहींनी चिरीमिरी घेऊन आपले हात बर काढले

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यामध्ये दिव-सेंदिवस बालविवाह होताना दिसत आहेत. शासन स्तरावर बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न केले जातात परंतु आष्टी तालुक्यामध्ये बाल संरक्षण समिती बरखास्त करण्यात आल्याचे दिसून येते. या समितीची शेवटची बैठक दि. ६ जून २०२४ रोजी झाल्याची माहिती समोर आली आहे. शासनाने कितीही प्रयत्न केले तरी तालुका स्तरावरील बाल संरक्षण समिती नसल्याने बालविवाह धुमधडाक्यात होत आहेत बालविवाह प्रतिबं थक कायदा कायद्यानुसार विवाहासाठी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असणे गरजेचे आहे. मुला मुलीचे वय वरील नुसार नसेल तर तो बालविवाह ठरतो. असे असतानाही आष्टी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात बालविवाह होत असल्याचे बाब समोर येत आहे. तालुकास्तरावर आणि गाव स्त-रावर बालविवाह रोखणारी सर-कारची यंत्रणा कुचकामी ठरत असल्याने हे विवाह होत आहेत. त्याचबरोबर तालुका स्तरावर असलेले बाल संरक्षण समिती ही गेल्या काही महिन्यांपूर्वी बरखा-स्त करण्यात आल्याचे संबंधित कार्यालयाकडून सांगण्यात आले त्याचबरोबर या समितीची शेवटची बैठकी होत नाहीत६ जून २०२४ रोजी झाल्याचे ही माहिती समोर आले आहे. जर तालुका स्तरावरील बाल संरक्षण समितीच का-र्यान्वित नसेल तर बालविवाह रोखणार कसे हाच प्रश्न निर्माण होतो. बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार वालविवाह करणे, आयोजित करणे किंवा प्रोत्साहन देणे हे करते कायदेशीर गुन्हा ठरतो. या कायद्याअंतर्गत दोषी आढळल्यास, दोन वर्षापर्यंतची शिक्षा किंवा एक लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही होऊ शकतात. तालुक्याचे तहसीलदार हे बाल संरक्षण समितीचे अध्यक्ष असतात तर बालविकास प्रकल्प अधिकारी हे या समितीचे सचिव असतात, गट विकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी, तालुका आरोग्य अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, ग्राम बाल संरक्षण, प्रतिनिधा सरपंच, बारा ते अठरा व्योगटातील मुले दोन, तर मुले दोन प्रतिनिधी, स्थानिक सामाजिक प्रतिनिधी अशी ही बालविवाह प्रतिबंधक समिती असते.



**एक वर्षांपूर्वी झाली बैठक :** बालविवाह रोखण्यासाठी तालुकास्तरावर व गाव स्तरावर शासनाची यंत्रणा काम करते. त्याचप्रमाणे तालुकास्तरावर बालविवाह रोखण्यासाठी बाल संरक्षण समिती असते. या समितीने तालुक्यात होणाऱ्या वालविवाह वर प्रतिबंध घालण्याचे काम करावे लागते. परंतु आष्टी तालुक्यातील बाल संरक्षण समिती ही काही महिन्यांपूर्वीच बरखास्त करण्यात आल्याची माहिती महिला व बालकल्याण विभागाच्या प्रकल्पाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. त्याचबरोचर या समितीची बैठक ही गेल्या वर्ची दिनांक ६ जून २०२४ रोजी झाल्याची माहिती देखील या कार्यालयाकडून देण्यात आलेले आहेत. काही ठिकाणी बालविवाह रोखण्यासाठी प्रशासनाची लोक गेली मात्र त्यांनी चिरीमिरीत बरबटले आहेत आपण म्हणतो अशा काही गोष्टी घडतात त्याला प्रशासनाचा धाक राहिला नाही मात्र हेच लोक कायदा तोडणाराला अभय देत आहेत.

## पाटोदा आगाराला नवीन पाच बसेस उपलब्ध मराठी पत्रकार परिषदेच्या पाठपुराव्याला यश

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्व तालुक्याला नविन बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.परंतु पाटोदा तालुक्याच्या वाटेल्या एक ही बस देण्यात आली नव्हती यासाठी मध्ये १३ फेब्रुवारी रोजी पाटोदा आगाराला नवीन बसेस कधी मिळणार या माथळ्या खाली बातमी प्रकाशित झाली होती.या साठी मराठी पत्रकार परिषदचे वतीने ही नविन बसेस देण्याची मागणी करण्यात आली होती.यासाठी पाटोदा येथील आमदार सुरेश धस यांच्या जनता दरबारात मागणी केली होती.याची दखल घेत आमदार सुरेश धस यांनी परिवहन मंत्री यांच्या निर्देशनास ही मागणी आणुन मंजुरी मिळवली.

आ. सुरेश धस यांनी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधल्यानंतर अखेर एसटी महामंडळाने तातडीने हालचाली सुरू केल्या. पाटोदा आगारासाठी अत्याधुनिक अशा पाच नवीन बीएस-६ गाड्या आज गुरुवारी (१५ मे) रात्री आगारात दाखल झाल्या. महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातील अनेक एसटी आगारांना नवीन बस मिळाल्या असताना, पाटोदा आगारांकडे सतत दुर्लक्ष होत होते. या प्रकरणी सतत पाठपुरावा करत जनता दरबारात एसटी महामंडळाच्या निष्क्रीय कारभाराचा पाढा वाचला होता. आमदार सुरेश धस यांनीही विभागीय नियंत्रकांची थेट संपर्क साधून दैनिक लोकमत व मराठी पत्रकार परिषदच्या मागण्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्याची सुचना केली होती.

त्यानुसार पाटोदा आगाराला नवीन गाड्यांची मागणी केली करण्यात आली होती ती गुरुवारी पुर्णत्वास गेली. गाड्यांच्या आगमना नंतर शुक्रवारी सकाळी पाटोदेकर नागरिक व प्रवाशांच्या वतीने नवीन लालपऱ्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आले. यावेळी नगराध्यक्षा प्रतिनिधी राजू भैय्या जाधव यांच्या हस्ते नविन गाड्यांची पुजा करण्यात आली.

# नशेसाठी औषध आणि गोळ्या विकणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलिसांनी मागील वर्षी सहा महिन्यापूर्वी शहरांमध्ये नशेच्या गोळ्या आणि औषध विकणारे रॅकेट पकडले होते, त्यानंतर हा उद्योग बंद पडला होता. परंतु त्यानंतर पुन्हा एकदा नवीन लोकांनी या डोके काढल्याची माहिती काल बीड शहर पोलिसांना मिळाली होती. यावरून काल रात्री अकरा वाजता जुना बाजार येथील हाफिस गल्ली येथे फैजान अस्लम खान पठाण याच्या राहते घरी छापा मारला असता तेथे उपचारासाठी असलेजे औषध गोळ्या याचा मोठा साठा मिळून आला. हीच औषधे नशे करण्यासाठी लोकांना विकत असल्याची खात्री पटली होती. त्यासोबत खालील आरोपी तेथे मिळून आले. फैजान खान असलम खान पठाण राहणार हाफिस गल्ली, सोहेल खान युसुफ खान पठाण राहणार, हाफिस गल्ली, शोएब खान ताजुद्दीन खान राहणार हत्तीखाना,



शेख फिरोज शेख सादेख राहणार गिराम गल्ली कारंजा यांना मुद्देमाला सह रंगीहात पकडले आहे. त्यांच्याकडून दोन लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मागील काही दिवसात शहरांमध्ये अशाप्रकारे अतिशय काटेकोर गुप्तता पाळून नशेचे औषध आणि गोळ्या चोरून लपून विक्री चालू होती. यामध्ये बऱ्याचदा लहान मुलांना सुद्धा अशा प्रकारचे नशेची औषध गोळ्या पुरवल्या जातात. यातून गुन्हेगारीची वाढ होत आहे असे लक्षात आल्यानंतर पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत यांनी अशा प्रकारचे रॅकेट शोधून काढून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यातून कालचा हा छापा मारून कारवाई करण्यात आली आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर उपविभागीय पोलिस अधिकारी श्री विश्वंभर गोल्डे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ, पोलीस अंमलदार सचिन अलगट, जयसिंग वायकर, सुशेन पवार, मीरा रेडेकर, मनोज परजणे, अश्फाक सय्यद, सखाराम माने यांनी केली आहे . ही कारवाई केल्यामुळे बीड शहर पोलीस स्टेशनचे नागरिकाकडून कौतुक होत आहे.

# विक्रीला काढलेल्या गावाला तहसिलदार यांनी दिली भेट

## मोबाईल टॉवर,रस्ता याबाबतीचा घेतला आढावा

आष्टी । प्रतिनिधी

गावात मुलभुत सुविधा नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे पाहून, संपुर्ण गावाने ठराव घेत गावच विक्रीला काढल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या.याची दंगल घेत आष्टी च्या तहसिलदार वैशाली पाटील यांनी सरपंच व गावकऱ्यांची भेट घेऊन गावचे प्रश्न तात्काळ सोडविण्यासाठी पुढाकार घेऊन गावाला सुविधा पुरविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आष्टी तालुक्यातील मौजे वनवेवाडी या गावाने गावच विक्रीला काढल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या.त्या अनुषंगाने:शनिवार (दि.१७) रोजी सकाळी साडेदहा वा.तहसीलदार आष्टी वैशाली पाटील यांनी




स्वत:गावात जाऊन गावातील सरपंच ग्रामपंचायत सदस्य व इतर गावकरी यांच्याशी चर्चा केली.यामध्ये प्रामुख्याने गावातील रस्ता याची मागणी व मोबाईलला रेंज नसल्यामुळे मोबाईल टॉवरची मागणी गावकऱ्यांनी केलेली आहे.मोबाईल टॉवरच्या संदर्भात बीएसएनएल च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची संपर्क साधून याबाबत तांत्रिक बाबी तपासून पुढील निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आलेले आहे.वनवेवाडी बीड-नगर या राष्ट्रीय महामार्गावरून गावात जाणारा अंदाजे तीन किलोमीटर चा रस्ता हा दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण करून अरुंद केलेला आहे.यामुळे रस्त्यावरून चालणेही अवघड झाले आहे.सध्या सरळ रस्ता

◀◀ पान ३ वर

# श्रुतिका सातपुतेचे दहावी परीक्षेत यश

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

तालुक्यातील जांब येथील बाजीराव पाटील



माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थ्यांनी.कु श्रुतिका अतुल सातपुते ने दहावी बोर्ड परीक्षेत ८८.२०% टक्के गुण मिळवत विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.शिक्षक पालकवर्गातुन,नातेवाईकाडून तिचे कौतुक होत असुन पुढील वाटचालीस श्रुतिकास शुभेच्छा मिळत आहेत.

# शिरूरमध्ये भारतीय जवानांच्या समर्थनार्थ काढण्यात आली तिरंगा रॅली

## पाकीस्तानचा निषेध करून शहीद जवान व पर्यटकांना वाहिली श्रद्धांजली; तिरंगा रॅलीची राष्ट्रगीताने झाली सांगता

शिरूर कासार । प्रतिनिधी

पहलगाम येथील अतिरेकी हल्यामधे मृत झालेले भारतीय नागरीक (पर्यटक ) व यानंतर प्रतिहल्ला (ऑपरेशन सिंदुर) मधे शहिद झालेले जवान यांना श्रद्धांजली वाहुन सध्या सिमेवर लढत असलेले भारतीय जवान यांच्या समर्थनार्थ शिरूर येथे तिरंगा रॅली काढण्यात आली.

पहलगाम येथील अतिरेकी हल्यामधे मृत झालेले भारतीय नागरीक (पर्यटक ) व यानंतर प्रतिहल्ला (ऑपरेशन सिंदुर) मधे शहिद झालेले जवान यांना श्रद्धांजली व सध्या सिमेवर लढत असलेले भारतीय जवान यांना समर्थनार्थ शिरूर येथे तिरंगा रॅली काढण्यात आली.या रॅलीमधे प्रशासन,नागरीकासह विद्यार्थी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.यावेळी प्रथम माजी सैनिक अशोक गिरी यांच्या हस्ते बसस्थानकामधे भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाला सुरूवात झाली.भारत माता की जय च्या घोषणांनी परिसर दणानून निघाला तर या रॅलीमधे हिंदु-मुस्लिम धर्माचे नागरीक सहभागी झालेले होते.यावेळी भाजपाच्या भाग्यश्रीताई ढाकणे/चेमटे,सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ भाऊ गवळी यांचेसह जेष्टपत्रकार विजयकुमार गाडेकर,पत्रकार गोकुळ पवार,शिवसेनानेते



सोपान काका मोरे,स्वच्छतादुत कु.योगीता गवळी,सरपंच ज्ञानदेव केदार,एम.एन.बडे,मधुकर केदारसर,सावळेराम जायभाये,अविनाश गाडेकरसर,बसस्थानक नियंत्रक कल्पना वाघमारे,पो.कॉ.माने साहेब यांचेसह आधिकारी,पदाधिकारी,विविध पक्ष,संघटना यांचे पदाधिकारी,शिक्षक व विद्यार्थी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.शेवटी राष्ट्रगीताने रॅलीची सांगता झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी केले तर आभार मधुकर केदारसर यांनी मानले.

# 'मेडिकयेर'कडून उच्च रक्तदाबनिमित्त जनजागृती रॅली

## आरोग्याच्या मूलमंत्राने बीड शहर दणाणले

**बीड । प्रतिनिधी**

**जागतिक उच्च रक्तदाब दिन (१७ मे) निमित्त बीडमध्ये मेडिकेयर हॉस्पिटलच्या वतीने आरोग्य जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. डॉ.सुनील बोबडे डॉ.अजित घोडके, डॉ. उमेश घायतिडक, डॉ. सुरेश पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली पार पडली, ज्यामध्ये रुग्णांच्या काळजीचे महत्त्व, रक्तदाब नियंत्रणाचे उपाय आणि नियमित तपासणीची गरज यावर भर देण्यात आला. या रॅलीत आरोग्याच्या जनजागृतीचे फलक विद्यार्थ्यांनीनी झळकावले होते.**



जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त बीड शहरामध्ये (दि.१७) मे शनिवार रोजी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, या रॅलीमध्ये डॉ. सुनील बोबडे, डॉ. अजित घोडके, डॉ. उमेश घायतिडक, डॉ. सुरेश पिंपळे यांसह अनेक आरोग्यकर्मी आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी बीडकरांनी मोठ्या प्रमाणात उत्साहाने सहभाग घेतला आणि उच्च रक्तदाबावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित तपासणी, संतुलित आहार आणि व्यायामाचे महत्त्व यावर भर देण्यात आला. आज च्या धाकाधकीच्या जीवनात माणसांना आरोग्याकडे लक्ष देणे शक्य नसल्यामुळे अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. कमी वयात अगदी तरुणपणात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याने अनेकांना जीव ही गमवावा लागतो, त्यामुळे आरोग्य ठीक तर आयुष्य ठीक असल्याचे सांगत मेडिकेयने ही जन जागृती रॅली आयोजित केली होती. या रॅलीत बीडकरांना आरोग्याचा कानमंत्र देण्यात आला.

# चाबूक काणी, गवताळ वाढ रोग वाढू नये यासाठी सिओ ६२१७५ ऊस जातीची लागवड टाळा : व्ही एस आय शास्त्रज्ञ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सद्यस्थितीत केज, अंबाजोगाई, धाराशिव, कळंब, लातूर तालुक्यातील गावांमध्ये ऊस पिकामध्ये चाबूक काणी, गवताळ वाढ रोग यांचा प्रादुर्भाव होऊन ऊस पिकाच्या उत्पादनामध्ये घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ऊस पिकामधील कीड व रोग यांचे व्यवस्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांपर्यंत शास्त्रोक्त माहिती पोहोचवण्याच्या अनुषंगाने नॅचरल शुगर रांजणीचे चेअरमन बी बी ठोंबरे, शेती कमिटीचे अध्यक्ष पांडुरंग आवाड, केन मॅनेजर मदन सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांच्या संकल्पनेतून वसंत दादा साखर संकुल पुणे येथील शास्त्रज्ञांच्या माध्यमातून दोन दिवसीय शिवार फेरीचे आयोजन करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर उपक्रमांतर्गत व्हीएसआयचे ऊस पैदासकार डॉ संतोष तळेकर, ऊस रोग शास्त्रज्ञ डॉ गणेश कोडगिरे, ऊस कीटक शास्त्रज्ञ डॉ तुषार शितोळे, ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी तट बोरगाव, भोसा,



नॅचरल शुगर कार्यक्षेत्रामध्ये व्हीएसआय पुणेच्या शास्त्रज्ञांनी केली ऊस कीड-रोग व्यवस्थापन जनजागृती

जायफळ, नायगाव, रांजनी, शिराढोण, दाभा, आवाड शिरपुरा आदी गावातील ऊस प्लॉटला भेटी देऊन शेतकऱ्यांना सिओ ६२१७५ या शिफारस नसलेल्या ऊस जातीची लागवड केल्यामुळे चाबूक काणी, गवताळ वाढ या रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे निदर्शनास आणून दिले त्यामुळे रोगांना बळी पडणाऱ्या सिओ ६२१७५ या ऊस जातीची लागवड टाळण्याचे आवाहन करून रोगग्रस्त अवशेष शेतामधून काढून नष्ट करणे, चाबूक काणी रोग व्यवस्थापनासाठी अ‍ॅझॉक्सीस्ट्रॉबीन १८.२ टक्के अधिक डायफेनोकोनाझोल ११.४ टक्के एससी या संयुक्त बुरशीनाशकाची १० मिली प्रति १० लिटर फवारणी करणे, कृषी विद्यापीठ, मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव,

◀◀ पान ३ वर

# देशसेवा हीच खरी जिव्हाळ्याची भावना

## अक्षय मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शहीद जवानांसाठी ५.३७ लाखांचा निधी नॅशनल डिफेन्स फंडसाठी सुपूर्त

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवणाऱ्या व्यक्तीमत्त्वांमुळे समाजात सकारात्मकतेचा जागर होत असतो. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे अक्षय मुंदडा यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त उचललेला एक अनोखा आणि प्रेरणादायी पाऊल. वाढदिवसाच्या दिवशी स्वत:साठी मोठे जल्लोष, समारंभ वा पार्टी करण्याऐवजी त्यांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केलेल्या शूर जवानांच्या कुटुंबीयांसाठी ५ लाख ३७ हजार रुपयांचा निधी नेशनल डिफेन्स फंडसाठी जमा करून एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला.

आज दिनांक १६ मे २०२५ रोजी, अंबाजोगाई येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात त्यांनी स्वतः उपस्थित राहून उपजिल्हाधिकारी दीपक वजाडे यांच्याकडे हा निधी चेकच्या स्वरूपात सुपूर्त केला.



या कार्यासाठी त्यांनी आपल्या निकटवर्तीय कार्यकर्त्यांची, हितचिंतकांची साथ घेतली आणि एक सामूहिक प्रयत्न म्हणून हा उपक्रम साकार केला. या प्रसंगी ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, भाजप शहराध्यक्ष संजय गंभीरे, माजी नगरसेवक महादू मस्के, तसेच परिसरातील अनेक सरपंच, कार्यकर्ते, आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.या सर्वांची उपस्थिती म्हणजे केवळ पाठिंबा नव्हे, तर अशा सामाजिक कार्यांना मिळणारी बळकटीच होती. सदर कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अक्षय मुंदडा यांच्या या उपक्रमाचे मन:पूर्वक कौतुक केले. ''आजचा युवक स्वतःच्या वाढदिवशी देशासाठी काहीतरी देतो आहे, ही गोष्ट केवळ अभिमानास्पद नव्हे, तर समाजातील इतर युवकांसाठी मार्गदर्शक ठरणारी आहे,'' असे उद्गार काही मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

नेशनल डिफेन्स फंड ही भारत सरकारची अधिकृत यंत्रणा आहे, ज्याद्वारे देशासाठी शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत केली जाते. अशा यंत्रणेसाठी निधी देणे म्हणजे देशभक्तीचे सर्वोच्च रूप होय. अक्षय मुंदडा यांनी या निधीसाठी स्थानिक स्तरावर जनसहभागातून निधी संकलित केला, आणि तो पारदर्शकतेने शासनाच्या अधिकृत फंडामध्ये सुपूर्त केला. यामुळे जनतेचा विश्वास वाढतो, आणि त्यातून अधिक व्यक्ती प्रेरणा घेऊन पुढे येतात.वाढदिवस साजरा करण्याची ही कल्पना आता एक मूव्हमेंट होऊ शकते, असं जाणकारांचं मत आहे. समाजासाठी, देशासाठी आणि शहीद कुटुंबीयांच्या सन्मानासाठी साजरा केलेला हा दिवस अनेकांसाठी आठवणीत राहील.




**माजलगाव :लोढा परिवाराच्या वतीने दहावीतील गुणवंत विद्यार्थी यांचा कौटुंबिक सत्कार डॉ.सुशील लोढा यांनी आयोजित केला होता. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे अध्यक्ष उमेश जेथलिया, रेणुका लोढा. यावेळी उपस्थित विद्यार्थी व पालक**

# न्यू हायस्कूल गंगामसला शाळेचा ९६.३६ टक्के निकाल

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित न्यू हायस्कूल गंगामसला शाळेचा दहावीचा निकाल ९६.३६ टक्के लागला आहे. या शाळेचे एकूण ५५ विद्यार्थी दहावी परीक्षेस बसले होते.त्यातील राजनंदिनी सोळंके हिने ९२.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. सोळंके सई अनिल हिने ९०.८० टक्के गुण घेऊन द्वितीय तर सोळंके करुणा आबासाहेब हिने ८९.६० टक्के गुण मिळवूनतर त्रतीय क्रमांक पटकावला.विशेष प्राविण्य -१२ विद्याथी,प्रथम श्रेणी-२३,द्वितीय श्रेणी-१४,तृतीय श्रेणी -४ विद्यार्थी असा निकाल लागला आहे. संस्थेचे शालेय समिती अध्यक्ष अविनाश सोळंके व सर्व शालेय समिती सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक बळीराम नाईकनवरे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार, दि.१८ मे २०२५ । पान ७

# आठ लाख शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप: उपमुख्यमंत्री पवार

बारामती । प्रतिनिधी

बदलत्या काळात सौर उर्जेकडे वळणे गरजेचे झाले आहे. त्यामुळे सौर उर्जेवर शेतीपंप चालावेत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. राज्यातील आठ लाख शेतकर्यांना सौर ऊर्जा पंप देण्यासाठी २४ हजार कोटींची तरतूद केली आहे. त्यामुळे वीज बिल कमी होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

बारामती तालुक्यातील मुढाळे येथे महापारेषण कंपनीकडून २२० केव्ही उपकेंद्राचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते झाले, या वेळी ते बोलत होते. राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजवर्धन शिंदे, जिल्हा बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, महापारेषणच्या पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता अनिल कोलप आदी या वेळी




उपस्थित होते.

लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारली आहे. आता आम्ही या योजनेवर महिलांना कर्ज देणार असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, सौर उर्जेचा वापर वाढण्याची आता गरज आहे. १ लाख ३० हजार घरांसाठी ५०० मॅगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा पंप शासनाने बसवले आहेत. येणार्या काळात राज्यातील ग्राहकांचे ७० टक्के वीज बिल टप्प्या-टप्प्याने कमी होईल. यातील काही अभ्यासू तांत्रिक लोकांनी तर वीज बिल शून्यावर येईल असेही आम्हाला सांगितले आहे. पण, मी तो दावा करणार नाही, शून्यावर आले नाही तर लोक मला थापा मारतोय असे म्हणतील. यंदाच्या वर्षी मान्सूनचे आगमन लवकर होणार आहे, त्यामुळे शेतकर्यांना आवश्यक असणारी खते, बी-बियाणे लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. बारामती शहर आणि तालुका वेगाने बदलतो आहे.

ज्या ठिकाणी पाण्याची अडचण असेल तेथे तत्काळ टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून द्या, असे आदेश तहसीलदारांना दिले आहेत. आम्ही सौर वीज उपलब्ध करून देत आहोत. त्याचाही फायदा होत आहे. मुढाळे येथील या वीज उपकेंद्रामुळे परिसरात विजेची कमतरता भासणार नाही. हे वीज उपकेंद्राचे काम एक वर्षात पूर्ण होईल, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असेही पवार म्हणाले.

# महाविद्यालयीन तरुणीचा सर्पदंशाने मृत्यू; वेळेवर उपचार मिळाले नसल्याचा नातेवाइकांचा आरोप

खेड । प्रतिनिधी

**आडगाव (ता. खेड) येथील प्रांजल तुकाराम गोपाळे (वय १७) या महाविद्यालयीन तरुणीचा सर्पदंशानंतर वेळेवर उपचार न मिळाल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. पाईटच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात वेळेवर उपचार न मिळाल्याने, तसेच योग्य सुविधा न मिळाल्याने तिचा मृत्यू झाला, असा आरोप तिच्या नातेवाइकांनी केला आहे.**

याबाबत मृत तरुणीच्या वडिलांनी महाळुंगे पोलिसांत तक्रार अर्ज दिला आहे. त्यानुसार महाळुंगे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन गिते यांनी माहिती दिली, की प्रांजल हिला तिच्या घराजवळ शुक्रवारी (ता. १६) सकाळी नऊच्या सुमारास सर्पदंश झाला. त्यानंतर तिला प्राथमिक उपचारांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र पाईट येथे आणले.



त्यावेळी आरोग्य केंद्रात सर्पदंशाची लस, तसेच डॉक्टर उपलब्ध नव्हते. त्यामुळे तीला उपचारासाठी चांडोली (राजगुरुनगर) येथे सरकारी रुग्णालयात नेण्यात आले. त्या रुग्णालयात लस उपलब्ध नव्हती. त्यामुळे तिच्यावर प्राथमिक उपचार करून तिला रुग्णवाहिकेतून उपचारासाठी यशवंतराव चव्हाण रुग्णालय पिंपरी येथे नेण्यात आले.त्या रुग्णवाहिकेत अत्यावश्यक सुविधा, तसेच रुग्णालयाचा कर्मचारी सोबत नव्हता. तसेच, इतर रुग्णालादेखील त्याच रुग्णवाहिकेतून नेण्यात आले. प्रांजल हिचा रुग्णवाहिकेतच दुर्दैवी मृत्यू झाला. महाळुंगे पोलिस ठाण्यात प्रांजलच्या मृत्यूची दप्तरी नोंद सर्पदंशाने मृत्यू, अशी केली आहे.

## वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आरोप फेटाळले

याबाबत पाईट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी सोनम रणवीर यांनी सांगितले की, ज्यांनी आरोप केलेला आहे, ते रुग्णाचे नातेवाईक रुग्णाला उपचारासाठी पाईट येथील आरोग्य केंद्रात घेऊन आले नाहीत. आम्ही आरोग्य केंद्रातच होतो. तसेच इतर कर्मचारी होते. या आरोग्य केंद्रात सर्पदंशावरील लस उपलब्ध होती. त्यांचे आरोप चुकीचे आहेत.

# ...अखेर कोरेगाव भीमावासीयांचा पाणी प्रश्न सुटला; पाणीपुरवठा योजनेसाठी मिळाली वन विभागाची जागा



कोरेगाव भीमा: गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेला कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथील पाणी प्रश्न अखेर सुटला आहे. कोट्यवधींचा निधी मंजूर होऊनही जागेअभावी गावासाठीची पाणी योजना रखडलेली होती. जागेसाठी सरपंच संदीप ढेरंगे यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी गेल्या ९ महिन्यांपासून वन विभागाकडे सतत पाठपुरावा करीत होते. त्यास यश मिळाले असून, कोट्यवधी रुपयांची जागा पाणी योजनेसाठी मोफत मिळाल्याने ग्रामस्थांनी आनंदोत्सव साजरा केला.

कोरेगाव भीमा या ठिकाणी असणार्या भीमा, भामा व इंद्रायणी नदीच्या दूषित पाण्यामुळे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. दरम्यान, सरपंच ढेरंगे यांनी या पाणी प्रकल्पासाठी वन विभागाची जागा मिळवून देण्यासाठी जुन्नर वनपरिक्षेत्राचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते व वनपरिक्षेत्र अधिकारी नीलकंठ गव्हाणे यांच्याकडे पाठपुरावा केला.

वनपाल गौरी हिंगणे, वनरक्षक बबन दहातोंडे यांचेही सहकार्य झाले, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यकारी अभियंता अर्जुन नाडगौडा, उपविभागीय अभियंता दत्ता पवार यांच्यासह माजी उपविभागीय अभियंता श्रीकांत राऊत यांचेही मोठे योगदान मिळाले.वन विभागाने कोरेगाव भीमा येथील पाणी योजनेसाठी वन विभागाची गट नंबर २७५ मधील ४२ गुंठे जागेची मंजुरी दिली. गेल्या १५ वर्षांपासून कोरेगावकरांना असलेली दूषित पाण्याची अडचण दूर होणार असल्याने ग्रामस्थांनी फटाके वाजवून, पेढे भरवून जल्लोष साजरा केला. (डरींशीीं झींपश छशुी)

सरपंच ढेरंगे यांच्यासह माजी पंचायत समिती सदस्य पी. के. गव्हाणे, मगर बँकेचे संचालक राजाराम ढेरंगे, 'घोडगंगा'चे माजी संचालक कैलासराव सोनवणे, माजी सरपंच अशोक काशीद, विलास खैरमोडे, संगीता कांबळे, सोसायटीचे माजी अध्यक्ष पंडित ढेरंगे, बबुशा ढेरंगे, तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष बबन गव्हाणे, विवेक ढेरंगे, बाळासाहेब वाडेकर, जालिंदर ढेरंगे, अर्जुन गव्हाणे, तानाजी ढेरंगे, ग्रामविकास अधिकारी श्रीकांत वाव्हळ व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# पुण्यात कॅन्टीन भागीदारीच्या नावाखाली १.३२ कोटींची फसवणूक

## एकाच कुटुंबातील पाच जणांविरुद्ध गुन्हा

पुणे : वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅन्टीनसह इतर व्यवसायात ५० टक्के भागीदारी देण्याचे आमिष दाखवून एका तरुणाची १ कोटी ३२ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात एकाच कुटुंबातील पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


शिवराज मधुकर शिंदे (वय २८, रा. दत्तनगर, आंबेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, राजेश आनंद (वय ५२), वीणा राजेश आनंद (वय ४८), बर्खा राजेश आनंद (वय ३५), चांदणी राजेश आनंद (वय २६) आणि वंश राजेश आनंद (वय २३, सर्व रा. तिरंगा चौक, कात्रज) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी शिवराज यांना भारती विद्यापीठ वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॅन्टीन, लॉन्ड्री आणि मेडिकल व्यवसायात ५० टक्के भागीदारी देण्याचे सांगितले. विश्वास बसावा यासाठी त्यांनी शिवराज यांची भारती हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. संजय ललवाणी यांच्याशी भेट घडवून आणली. तसेच, त्यांच्या कार्यालयातील 'मामा' नावाच्या व्यक्तीशी बोलणे सुरू असल्याचे सांगितले. यानंतर वेळोवेळी व्यवसायासाठी १ कोटी ३२ लाख ३० हजार रुपये उकळले. मात्र, प्रत्यक्षात आरोपींनी फसवणूक करून रहात्या घरातून पलायन केल्याचे उघड झाले. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक खिलारे करत आहेत.

# गुंड गजा मारणेच्या साथीदारांच्या चार कार जप्त

पुणे । प्रतिनिधी

गुंड गजानन मारणे याला येरवडा कारागृहातून सांगली कारागृहात नेत असताना पोलिस व्हॅनचा मागावर असलेल्या मारणेच्या साथीदारांच्या चार महागड्या कार पोलिसांनी जप्त केल्या आहेत.



सांगलीला नेताना सातारा परिसरातील ढाब्यावर झालेल्या मटण पार्टी प्रकरणात मारणेच्या सांगलीतील साथीदाराला पोलिसांनी नुकतीच अटक केली आहे. या प्रकरणात सहायक पोलिस निरीक्षकासह चार पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

संगणक अभियंत्याला कोथरूडमध्ये भर रस्त्यात बेदम मारहाण केल्याप्रकरणी मारणेसह सहा जणांविरुद्ध पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आलेली आहे. या गुन्ह्यात पोलिसांनी यापूर्वी मारणेच्या दोन महागड्या कारसह एकूण चार कार जप्त केल्या होत्या.मारणेला बिर्याणी देणारे, तसेच त्याला भेटायला आलेले साथीदार पांडुरंग ऊर्फ पांड्या मोहितेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मोहिते याला गुन्हे शाखेने सांगलीतून नुकतीच अटक केली. पोलिस व्हॅनचा मारणेच्या साथीदारांनी मोटारीतून पाठलाग केला. सीसीटीव्ही चित्रीकरणात सहा ते सात कार आढळून आल्या आहेत. या प्रकरणात चार कार जप्त करण्यात आल्या आहेत.उर्वरित मोटारचालकांचा शोध घेण्यात येत आहे. कोथरूड मारहाण प्रकरणात आतापर्यंत पोलिसांनी मारणेसह साथीदारांच्या आठ कार जप्त केल्या आहेत, असे गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त गणेश इंगळे यांनी सांगितले.

# मुळा नदी सुधार प्रकल्पाचे काम थांबवा; महापालिका पर्यावरण विभागाचे ठेकेदाराला आदेश

पिंपरी : मुळा नदी सुधार प्रकल्पामुळे नदी व पर्यावरणाची हानी होत असल्याचा आरोप करत पर्यावरणप्रेमींनी जनआंदोलन सुरू केले आहे. आंदोलकांच्या आक्षेपांमुळे पिंपळे निलख स्मशानभूमीजवळ एका ठिकाणी महापालिकेच्या पर्यावरण विभागाने काम तात्पुरते थांबविण्याचे आदेश संबंधित ठेकेदाराला दिले आहेत. प्रशासनाने काही सुधारणांसाठी हा तात्पुरता निर्णय घेतल्याचे म्हटले आहे.

मुळा नदी सुधार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात वाकड बायपास ते सांगवी पूल असे नदीकाठ सुशोभीकरणासाठी बांधकाम सुरू आहे. हे प्रकल्प पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने राबविले जात आहेत. संबंधित कामासाठी बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला ठेका देण्यात आला होता. पिंपळे निलख येथील स्मशानभूमीजवळील कामाबाबत नागरिक आणि विविध पर्यावरणवादी संघटनांनी आक्षेप नोंदवले होते. त्यांनी नदीमध्ये टाकला जाणारा भराव आणि नदीकिनारी होणार्या पर्यावरणीय हानीबाबत चिंता व्यक्त केली होती. त्याबाबत जलसंपदा विभागाने महापालिकेस दोन नोटिसाही बजावल्या आहेत. परिणामी या भागातील कामाचा फेरविचार करण्यासाठी महापालिकेने तांत्रिक समितीकडून नव्याने अहवाल मागवला आहे.

महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या १४ मे रोजीच्या पत्रानुसार पिंपळे निलख स्मशानभूमीजवळील भागातील काम तात्पुरते थांबविण्याचे आदेश ठेकेदाराला देण्यात आले आहेत. पुढील आदेश येईपर्यंत कोणतीही कामे करण्यात येऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. यासंदर्भात नदी बचाव आंदोलन करणार्या कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# स्वप्नातली घरं डोळ्यादेखत बेचिराख, पिंपरी चिंचवडमधील ३६ बंगले जमीनदोस्त

पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवडमध्ये तब्बल एक ते दीड कोटी रुपये खर्चून बांधलेली घरं डोळ्यादेखत जमिनदोस्त केली आहेत. पिंपरी चिंचवडमधील ३६ बंगलो धारकांवर ही वेळ आली आहे. इंद्रायणी नदीच्या ( खपवीरूपळ ीळींशी) पुररेषेत त्यांनी उभारलेले बंगले पालिकेने काही तासांतच जमीनदोस्त केले आहेत. गेल्या वर्षभरापासून सुरु असलेल्या न्यायालयीन लढ्यानंतर येथील ३०० रहिवाशी बेघर झाले आहेत. रिव्हर व्ह्यूच्या नावाखाली मनोज जरे या बिल्डरने या सर्वांची फसवणूक केली आहे. पालिकेच्या अनधिकृत विभागाची त्यांना साथ लाभल्याचा आरोप बेघर झालेल्या रहिवाशांनी केला आहे. त्यामुळं बिल्डर आणि पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई होणं अपेक्षित आहे.

पिंपरी चिंचवडमधून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीकाठी बंगला उभारायला मिळाला तर? साहजिकच असं स्वप्न अनेकांचं असतं. हेचं हेरुन पिंपरी चिंचवडमधील मनोज जरे नामक बिल्डरने रिव्हर व्हीला प्रोजेक्ट लाँच केला आहे. प्रत्यक्षात पुररेषेत अर्थात ब्लु लाईनमध्ये असणारा हा प्रोजेक्ट रेसिडेंशल झोनमध्ये असल्याची बनावट कागदपत्रे त्याने ग्राहकांना दाखवली. त्याचे दस्त ही झाले अन बंगले ही उभे राहिले. पालिकेच्या अनधिकृत



विभागाच्या अधिकाऱ्यांनी पैसे खाऊन, परवानगी देऊ असं खोटं आश्वासन ही दिलं. पाणी, वीज सगळं पालिकेने पुरवलं. पण अखेर हे ३६ बंगले रहिवाश्यांच्या डोळ्यादेखत जमीनदोस्त करण्यात आले आहेत.

२०१७ साली पहिला बंगला उभारायला सुरुवात झाली. तेव्हा वकील तानाजी गंभीरेंनी ही बाब पालिकेच्या निदर्शनास आणून दिली होती. पालिकेने दुर्लक्ष केलं, म्हणून हरित लवादाकडे याविरोधात याचिका दाखल करण्यात आली, कोरोनाचा काळ असल्यानं सुनावणी रखडली. प्रत्यक्षात सुनावणी सुरु झाली तेव्हा इथं ३ बंगले उभे होते. पालिकेने सुनावणी दरम्यान २९ बंगले उभारले गेल्याची माहिती सादर केल्याचा तक्रारदाराने दावा केला होता. १ जुलै २०२४ मध्ये बंगल्याची संख्या ३६ वर पोहोचल्याचं पाहून हरित लवादाने ताशेरे ओढले अन हे बंगले ६ महिन्यात जमीनदोस्त करण्याचे आदेश पालिकेला दिले. तसेच संबंधितांकडून ५ कोटींचा दंड वसुलण्याच्या सूचना देण्यात आल्या.

३१ डिसेंबर २०२४ ला ही मुदत संपणार तेव्हाच न्यायालयाने कारवाईला स्थगिती दिली. सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी झाली अन ५ मे २०२५ला तातडीनं या बंगल्यांवर हातोडा चालवण्याचे आदेश देण्यात आले. ६ मे ला पुढची स्थगिती देण्यास न्यायालयाने मनाई केली अन अखेर ३०० रहिवाश्यांना बेघर होण्याची वेळ आली

# धानोरी- लोहगाव परिसरातील विविध नागरी प्रश्नांसाठी शांततामय मूक धरणे आदोलन संपन्न



विश्रांतवाडी : धानोरी- लोहगाव रहिवासी संघटना (उ्ळ्ठ-) यांच्या वतीने आज विविध नागरी प्रश्नांसाठी जन आक्रोश मूक धरणेआंदोलन धानोरी जकात नाका येथे यशस्वीरीत्या पार पडले. यामध्ये शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून गंभीर नागरी समस्या मांडल्याः. यात अपुरा व अनियमित पाणीपुरवठा, वारंवार आणि अनियोजित वीजपुरवठा खंडित होणे, रस्त्यांची दुरवस्था व पादचारी मार्गाचा अभाव, पोलिस ठाण्याचा अभाव व सुरक्षिततेची कमतरता, नेहमी होणारी वाहतूक कोंडी व नियोजनाचा अभाव आदी समस्या मांडण्यात आल्या.

या आदोलनात नागरिकांनी कोणताही राजकीय झेंडा न वापरता, केवळ आपल्या हक्कासाठी शांततेने आणि संयमाने आदोलन केले. संघटनेचे अध्यक्ष गिरीश जयवाल यानी सांगितले की, जर प्रशासनाने तात्काळ कारवाई करून समस्या सोडवल्या नाहीत, तर आम्हाला आणखी तीव्र आंदोलनात्मक पावले उचलावी लागतील.संघटनेच्या पुढाकारामुळे नागरिकांचा आवाज बुलंद झाला असून, संघटना भविष्यातही नागरी हक्कांसाठी संघर्ष करीत राहील. या वेळी माजी आमदार सुनील टिंगरे, सुनील खांदवे, बंडू खांदवे, राजेंद्र खांदवे, संतोष खांदवे, शशी टिंगरे, संतोष पाटोळे, धनराज मुंगळे, मनोज पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# इंदापूरच्या काटी गावात सरपंच विपुल वाघमोडेंचा स्वच्छता मोहीमेला प्रारंभ

इंदापूर : इंदापूर तालुक्यातील काटी गावाचे नवनिर्वाचित सरपंच विपुल वाघमोडे यांनी गाव स्वच्छ आणि सुंदर करण्याचा संकल्प सोडला आहे. स्वच्छतेच्या मोहिमेत स्वतः पुढाकार घेत त्यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने गाव चकाचक करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे गावकऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

सरपंच विपुल वाघमोडे यांनी माहिती देताना सांगितले की, स्वच्छ गाव, सुंदर गाव हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून गावातील प्रत्येक कुटुंबाला छोट्या आणि मोठ्या आकाराच्या दोन कचरा कुंड्या मोफत दिल्या जाणार



आहेत. यापुढे गावकऱ्यांनी कचरा रस्त्यावर किंवा अस्ताव्यस्त न टाकता कचरा कुंड्यांमध्येच टाकावा, अशी विनंती त्यांनी केली.

गावातील पाणीपुरवठ्याबाबत बोलताना वाघमोडे म्हणाले, मागील दोन-तीन दिवसांपासून पाणीपुरवठ्याबाबत गावकऱ्यांना त्रास सहन करावा लागला, याबद्दल मी क्षमा मागतो. ग्रामपंचायत कर्मचारी आणि गावातील तरुणांच्या अथक प्रयत्नांमुळे पाणीपुरवठा व्यवस्था पूर्ववत झाली आहे. आता सर्वांना मुबलक पाणी मिळेल.

गावातील स्वच्छता अभियान जोमाने सुरू असून, यात गावकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन गाव सुंदर बनवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन सरपंच वाघमोडे यांनी केले. काटी ग्रामपंचायतीच्यावतीने ही गावकऱ्यांना या अभियानात सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रसंगी उपसरपंच उमा यादव, ग्रामसेवक संतोष मोहिते, ग्रामपंचायत कर्मचारी, सदस्य आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच वाघमोडे यांच्या या पुढाकारामुळे काटी गाव स्वच्छतेच्या दिशेने नवा टप्पा गाठण्यास सज्ज झाले आहे.

# बिबवेवाडीत अल्पवयीन मुलांकडून वाहनांची तोडफोड; ९ जण ताब्यात

पुणे - बिबवेवाडीत अल्पवयीन मुलांनी वाहनांची तुफान तोडफोड करत दहशत माजवली. ही घटना शुक्रवारी रात्री न्यू पद्मावती नगर येथे घडली. याप्रकरणी बिबवेवाडी पोलिसांनी अवघ्या काही तासांत सात अल्पवयीन मुलांसह नऊ जणांना ताब्यात घेतले आहे. घटना घडल्यानंतर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात दाखल झाले होते.

गणेश कोळी ( २० रा. न्यू पद्मावती नगर) आणि आविष्कार भालेराव (२० रा. न्यू पद्मावती नगर ) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, आरोपी गणेश याला काही जणांनी न्यू पद्मावती नगर येथे मारहाण केली होती. याचा बदला घेण्यासाठी गणेश, अविष्कार आणि इतर अल्पवयीन मुले शुक्रवारी रात्री न्यु पद्मावती नगर येथे कोयता आणि लाकडी दांडके घेऊन गेले होते. तेथे



बरीच शोधा शोध करुनही मारहाण करणारे भेटले नाहीत. यामुळे जाताना आरोपींनी रस्त्यात उभ्या असलेल्या वाहनांची कोयते आणि लाकडी दांडक्याने तोडफोड केली. यामध्ये एक रिक्षा आणि इतर दुचाकी वाहनांचा समावेश होता.

तोडफोडीचा आवाज ऐकून नागरिक घरातून बाहेर पडले. तेव्हा आरोपींनी त्यांना हत्यारांचा धाक दाखवून दहशत माजवली. दरम्यान काही नागरिकांनी मोबाईलमध्ये तोडफोडीचे चित्रीकरण केले. ते व्हायरल झाल्याने मोठी खळबळ माजली होती. घटनास्थळी गुन्हे शाखा आणि बिबवेवाडी पोलिसांची पथके दाखल झाली होती. बिबवेवाडी पोलिसांनी काही तासातच तांत्रिक तपासाव्दारे आरोपींचा माग काढला. त्यांच्याकडून तीन कोयते जप्त करण्यात आले आहेत.आरोपींचे कोणतेही पुर्वीचे रेकॉर्ड नाही तसेच ते कोणतेही कामधंदे करत नाहीत. यातील अल्पवयीन मुले १२ ते १७ वयोगटातील आहेत. याप्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अशोक येवले करत आहेत.